
छात्र

# प्रबोधन

वर्ष ५ अंक ५
सौर मार्गशीर्ष शके १९१८



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक।




## ऐका होऽऽ शब्दांना कंठ फुटले

**छात्र प्रबोधनच्या ध्वनिफीत आवृत्तीचा**
**पहिला अभिनव – यशस्वी प्रयोग**

# "पंख सुरांचे"

**या आवाजी दुनियेची (कॅसेटची) वैशिष्ट्ये**

- डॉ. जयंत नारळीकरांची मुलाखत
- प्रा. द. मा. मिरासदारांचे कथाकथन
- श्री. मंगेश पाडगावकरांचे काव्य वाचन
- पक्ष्यांचे आवाज अन् त्यांची ओळख.

याशिवाय, गाणी, समूहगीत, लोकगीत,
नाट्यछटा, नावीन्यपूर्ण जाहिराती
अशा भन्नाट अभिनव कल्पनांचा मिलाफ!

**९० मिनिटे धुंद होऊन अनेकांबरोबर पुन्हा पुन्हा ऐकाविशी वाटणारी कॅसेट आपल्याकडे हवीच.**

**खास सवलत मूल्य रु. ४०/-** (पोस्टाने मागविण्यासाठी पोस्टेजखर्च रु. १०/- जादा पाठवावा.)

छात्र प्रबोधनच्या मुख्य अथवा स्थानिक कार्यालयात उपलब्ध.


**यावर्षीच्या दीपावली विशेषांकासोबत दिलेल्या शुभेच्छापत्राचे श्यामधवल छायाचित्र.**



ॐ

छात्र प्रबोधन

इवली शल्ये रुपती खुपती मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी ने ज्योतिर्जगतात

वर्ष ५ अंक ५
सौर मार्गशीर्ष, शके १९१८

# अंतरंग


- संवाद २
- चित्तथरारक अमरनाथ यात्रा ३
- कवितेचं पान ८
- कथा–हिरामोती ९
- तुम्हाला माहीत आहे काय? १६
- नाट्यछटा – आली सुट्टी! गेली सुट्टी! १७
- वेताळाच्या ज्योती १९
- स्वप्नांची छायाचित्रे २१
- हे ऋषिवर श्रीअरविंद २५
- दीपावली विशेषांक वितरण केंद्रे ३०


**संपादक प्रकाशक**
महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E.M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc.B.Ed.
अनघा लवळेकर B.A.B.Ed.
शैलजा देशमुख M.A.M.Ed.

**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
भास्कर सगर

**अक्षर जुळणी**
प्रिंट लिंक, पुणे – ५.

**मुद्रक**
प्रबोध संपदा, पुणे – २.

**संपर्क**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ,
पुणे – ४११ ०३०.
☎ ४७७६९१

**वार्षिक नोंदणी क्रमांक** PHM/153/VIII

**प्रकाशन दिनांक**
१६ मागशीर्ष, शके १९१८
७ डिसेंबर १९९६

**वर्गणी**
वार्षिक – रु. १००/–
द्वैवार्षिक रु. १८५/–
त्रैवार्षिक – रु. २७५/–
आजीवन रु. २०००/

**दीपावली विशेषांक मिळाला का?**

**नसल्यास** पान क्र. ३० पाहा.

असल्यास त्याबद्दलच्या प्रतिक्रिया आवर्जून कळवा. कोणते लेख, कथा–कविता आवडल्या, त्या कशामुळे आवडल्या, काय आवडले नाही? कोणकोणत्या गोष्टी करून बघितल्या, कोणता विचार मनामध्ये विशेष ठसला, कोणता विचार पटला नाही. दिवाळी अंकात अजून काय हवे होते. इत्यादीसंबंधी **२५० ते ३०० शब्दांमध्ये तुमच्या प्रतिक्रिया सुवाच्य अक्षरात लिहून ३१ डिसेंबर पूर्वी मुख्य कार्यालयात पाठवा.** पहिल्या पाच क्रमांकांच्या प्रतिक्रियांना ज्ञान प्रबोधिनीकृत स्फूर्तिगीतांची ध्वनिफीत बक्षीस म्हणून पाठविली जाईल.



प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,

दीपावली विशेषांक एव्हाना वाचून पूर्ण झाला असेल. त्यातल्या काही गोष्टी करून बघितल्या असतील. काही येत्या एक–दोन महिन्यात करून बघाल. हो ना!

सर्वसाधारणपणे बहुतेक सर्व नियतकालिके ‘दीपावली विशेषांक’ हा दोन अंकांचा मिळून काढतात व त्यामुळे एका अंकाला सुट्टी देतात. **आपले** मात्र नुसते **मासिक** नाही. **तुम्हा सर्व सभासदांशी नियमित संपर्काचे ते एक साधन आहे.** आणि म्हणूनच आपण सुट्टी घेत नाही. हा अंक ३२ पानांचा आहे. पुढचे अंक नेहमीप्रमाणे ४८ पानांचे असतील.

‘धटासी असावे धट’ हे वाक्य म्हणायला आणि ऐकायला बरं वाटतं. पण त्याप्रमाणे खरोखरच घडायचं असेल तर सध्याचे दिवस फुकट आळसात घालवून चालणार नाहीत. हिवाळा अन् गुलाबी थंडी जाणवू लागली ना! हाच काळ आहे मनसोक्त व्यायाम करायचा! आयुष्यात आपल्या सर्वांना खूप मोठमोठी कामं करायची आहेत, अनेक राष्ट्रीय प्रश्नांवर उत्तरं शोधून ती प्रत्यक्षात आणण्यासाठी दिवसरात्र मेहनत घ्यायची आहे. हे सर्व करण्यासाठी जसं मन कणखर हवं, बुद्धी तल्लख हवी, तसं **शरीरही निरोगी आणि पोलादी असायला हवं.** शरीर कमावण्यासाठी तुमचं किशोर वय अगदी योग्य आहे. समर्थ रामदास, लोकमान्य टिळक यांसारख्या थोर पुरुषांनी त्यांच्या वयातील महत्त्वाची वर्षे शरीर साधनेमध्ये घालविली होती.

म्हणूनच आपणही शरीर संपदा मिळविण्यासाठी या हिवाळ्याचा उपयोग करून घ्यायला हवा. घाम येईपर्यंत व्यायाम, चौरस आहार आणि रात्रीची छान विश्रांती–झोप ही त्रिसूत्री लक्षात घेऊन आळस आणि ऐशाराम बाजूला ठेवून आत्ताच शरीराला ताण दिला तर आयुष्याच्या नव्वदीपर्यंतही आपण चांगले कार्यक्षम अन् ठणठणीत राहू. नाहीतर चाळीशीतच विविध रोगांनी आपलं शरीर पोखरायला सुरवात होईल. असं होऊन कसं बरं चालेल! मग लागणार ना व्यायामाला! अन् तुमचा व्यायाम कसा चालू आहे हे आम्हालाही कळवणार ना!


आणि हो, व्यायाम म्हणजे फक्त मुलांनीच करायचा असं मुलींनी अजिबात म्हणता कामा नये. मुलींनीही भरपूर व्यायाम करायला हवा. मनसोक्त खेळायला हवं. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवायची की शरीराला एकदम ताण किंवा हिसका द्यायचा नाही तर व्यायाम हळूहळू वाढवत न्यायचा. तुमच्या नियमित व्यायामाला आमच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

येते तीन महिने महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मेळावे होतील. त्यासंबंधी अधिक माहिती वितरण केंद्रांवर वेळोवेळी पाठविली जाईल. त्यांच्याशी संपर्क ठेवा अन् मेळाव्यात सहभागी व्हा!

मग भेटूयात समक्ष अथवा पत्राद्वारे!

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**



# चित्तथरारक अमरनाथ यात्रा

**– अनिल देशमुख**

*अमरनाथच्या वाटेवर सुरुवातीला निसर्गाचं मोहक रूप न्याहाळताना यात्रेकरूंच्या स्वप्नातही आलं नसेल की याच निसर्गाचं रौद्र दर्शनही आपल्याला घडणार आहे. यावर्षी अमरनाथ यात्रेसाठी गेलेल्या अनेक यात्रेकरूंनी हा जीवघेणा अनुभव घेतला. ज्ञानप्रबोधिनीचे एक युवा कार्यकर्ते श्री. अनिल देशमुख हे त्यापैकीच एक! जीवनमृत्यूचं तांडव पाहताना त्यांच्या संवेदनशील मनाने टिपलेले काही अविस्मरणीय अनुभव क्रमशः दोन भागात देत आहोत.*

'जय बाबा अमरनाथकी' च्या घोषात सुरू झालेली अमरनाथ यात्रा पुण्यापासून जम्मूपर्यंत व्यवस्थित पोहोचली.

जम्मूमधील एका रात्रीचा मुक्काम करून दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच म्हणजे ६-६।। ला पहलगामच्या दिशेने कूच केले. आणि पुढे संपूर्ण दौऱ्यात जाम वैताग आणणाऱ्या जामची ओळख झाली. जम्मूतून श्रीनगरकडे गाड्या एकट्या दुकट्या न सोडता ग्रुपने सोडतात. यासाठी २-३ तास रांगेत थांबायला लागले. मग कोठे पहलगामच्या दिशेने प्रवास सुरू झाला.

उधमपूर मागे पडले. ६०-७० कि.मी.चा प्रवास झाला असेल. नंतर मात्र कासवगतीने प्रवास सुरू झाला. बस पटणी टॉप या हिल स्टेशनवर आली. आभाळ ढगाळ होते. पण थोड्याच वेळात धुके एकदम वाढले आणि सगळा परिसर काळ्या ढगात वेढला गेला. उंच सूचिपर्णी वृक्षामधून जाणारे धुके, डोंगर उताराचे रस्ते, हवेतील गारवा आणि ढगाने वेढले गेलेले आपण. तरी पावासाचा टिपूस नाही. हा सगळाच एक विलक्षण अनुभव होता. पटणी टॉपचा डोंगर उतरल्यावर रात्री ८-८।। ला रस्त्यावरच जेवणही



*With Best Compliments From* - SUNIKEM ENTERPRISES, PUNE.

उरकले. आता मुक्काम इथेच होणार असे वाटत असताना ११ च्या सुमारास पुन्हा गाड्या पुढे जायला सुरुवात झाली. रात्री २-२।। वा. रामबन येथे पोहोचलो. इथेच सर्व गाड्या थांबून राहिल्या होत्या.

नेहरू बोगदा ओलांडला आणि काश्मिर घाटीत बसने प्रवेश केला. यानंतर सृष्टिसौंदर्य वाढत्या श्रेणीत वाढत गेले. डोंगरांमधील अंतर वाढू लागले. मधला मैदानी पट्टाही रुंदावत गेला. मैदानात लांबवर पसरलेली हिरवीगार शेती. त्यात मधूनच उंच वृक्ष, अधूनमधून मोठमोठे गोटे असलेले ओढे. रस्ता मात्र आता सरळ होता.

गाडी अनंतनागमध्ये आली. एकेकाळी हा अतिरेक्यांचा बालेकिल्ला होता. अजूनही अधूनमधून एखादा मोर्चा निघतोच. गाव छोटे शहर म्हणण्याइतके मोठे.

अनंतनागहून निघाल्यावर मात्र गाडी थेट पहलगामपर्यंत विनासायास पोहोचली. हा संपूर्ण प्रवास हिरव्यागार आणि रमणीय अशा प्रदेशातून झाला. पहलगाममध्ये पोहोचलो तेव्हा १।।-२ चा सुमार असावा. त्यामुळे लगेच पुढे छोट्या बसने १६ कि.मी. वरील चंदनवाडी-पर्यंत जाऊन तिथे मुक्काम करण्याची योजना होती. गाव ओलांडून एका मैदानात जागा होती तिथे बस पार्क करून बस स्टँडकडे निघालो. वाटेत लागणाऱ्या प्रत्येक लंगरमधील कार्यकर्ते आग्रहाने हाताता 'प्रशाद' ठेवत होते. गर्दीतून वाट काढत स्टँडपर्यंत आलो आणि आमच्याबरोबरच्या सहप्रवाशांचे हात पाय गळाले कारण स्टँडवर प्रचंड गर्दी होती. १००-१२५ काडेपेटी-सारख्या दिसणाऱ्या मिनीबसेस चंदनवाडीपर्यंत जा-ये करीत होत्या; पण प्रत्येक बस माणसांनी लगडून जात होती.

त्यादिवशी मग आम्ही लॉजवरच राहिलो. दुसऱ्या दिवशी सकाळी स्पेशल गाड्या वेळेवर आल्या आणि चंदनवाडीकडे कूच केले. वाट अरुंद असल्याने १४ कि.मी. ला २।। तास लागले. त्यातही शेवटचे १।। कि.मी. पायीच जावे लागले; कारण गाड्यांची मोठी रांग लागली होती. चंदनवाडीमध्ये पोहोचेपर्यंत बहुतेकांचा पायी चालण्याचा उत्साह मावळला होता. ५५ पैकी ५जण चालणारे राहिले. चंदनवाडीपासून १-१।। कि.मी. गेल्यावर सर्वात अवघड पिसू घाटीचा चढ लागतो. सिंहगडापेक्षा चढा आणि दुप्पट तिप्पट अशा उंचीची ही घाटी मुंग्यांसारख्या चढणाऱ्या माणसांनी भरून गेली होती. शॉर्टकटस्‌नी मार्ग काढत त्या मानाने सहजपणे ही घाटी पार केली. त्यापुढचा टप्पाही मजल दरमजल करीत पार केला. शेषनाग दिसू लागले तेव्हा ५-५।। वाजले असतील. उजव्या बाजूला खोलवर प्रशस्त असे शेषनागाचे तळे. डाव्या बाजूला उंच डोंगर. तळ्यापलीकडे अणकुचीदार पांढऱ्याशुभ्र बर्फाने मढलेली फण्यासारखी दिसणारी शिखरे आणि त्यांचे तळ्यात पडलेले प्रतिबिंब! मनाला मोहवून टाकणारे असे दृश्य होते. या तळ्यात खरोखरच शेषनागाचे दर्शन होते अशी लोकांची समजूत आहे. सकाळी १०।। ते ७।। पर्यंत पिसूघाटी सकट (म्हणजे ३ सिंहगड) चंदनवाडी ते शेषनाग हा १४ कि.मी.प्रवास करून आम्ही पायपीटीचा वेग वाढवला. कारण दिवसाउजेडीच आम्हांला मुक्कामी पोहोचायचं होतं. त्यातच आमचा गुलाम महंमद पिठ्ठू चुकला. त्याला शोधणे



*केदार देवगावकर याच्या वतीने छात्र प्रबोधनच्या वैशिष्ट्यपूर्ण वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!*



भाग होते; परंतु रात्र फार झाल्याने त्याचा शोध थांबवून आम्ही पहिल्यांदा टेंट शोधू लागलो.

'अरे कोई टेंटवाला है क्या टेंटवाला?' अरुंद, खाचखळग्याच्या आणि लोकांनी तुडुंब भरलेल्या रस्त्यातून लंगरकरता लागलेल्या रांगांमधून धक्के खात आणि अधून मधून टेंटवाल्यासाठी पुकारा करत गावाच्या जवळ जवळ दुसऱ्या टोकाला आम्ही पोहोचलो. तिथे एका हॉटेलमधून एकजण पुढे आला. हॉटेल म्हणजे तंबूच पुढे पाव भागात स्वयंपाक आणि उरलेल्या १०x १० च्या भागात मावतील तेवढे यात्रेकरू अशा थाटाचे. तरी तंबूचे भाडे २२०० रु. देऊन एकदाचा राहुटीवजा तंबू घेऊन टाकला.

सकाळी उठून ६ वा. पुन्हा पिट्टूच्या शोधात निघालो. सुदैवाने तो लवकर सापडला आणि त्यामुळे आम्ही घाईघाईने चहा-पोळीचा नाष्टा उरकून घोडे करून पुढे निघालो.

शेषनाग ते पंचतरणी दोन्ही बाजूला दिसणारी बर्फाने खरवडून काढलेली आणि निष्पर्ण केलेली विविध आकार ल्यालेली ओबड-धोबड शिखरे. त्यातून वहात आलेल्या हिमनद्यांमध्ये येणारे पाण्याचे प्रवाह. त्यातून घोड्यावर तोल सांभाळत पाय बुडू न देता केलेली वाटचाल.

या सर्वांवर कडी केली ती पंचतरणीने. पाच प्रवाहांनी तयार झालेले विस्तीर्ण वाळवंट. त्याच्या दोन्ही बाजूला मोठमोठे कडे असलेले आणि शिखरावर बर्फ असलेले पहाड. प्रवाहाच्या दिशेने लांबवर दिसणाऱ्या दऱ्या. नदीच्या काठाने डोंगराच्या कडेने अमरनाथकडे जाणारी पायवाट. मुख्य प्रवाह ओलांडताना पाय बुडू न देण्याची कसरत करताना घोड्यावरून गटांगळी खाता खाता वाचलो. नदीच्या पलीकडे पुन्हा तंबूच्या रांगा. पलीकडे मिलिटरीचे तंबू.

तंबू घेऊन तिथे थोडी विश्रांती आणि जेवण करून अमरनाथच्या दिशेने वाटचाल करावी असे ठरविले. तेवढ्यात बातमी कळाली की वरती फारच गर्दी झाल्यामुळे मिलिटरीने अकरा वाजताच पुढचा रस्ता बंद केला आहे. आता मुक्काम करण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. तंबूत सामान टाकून बाहेर पडलो आणि शेजरच्या लंगरमधून जेवण करून परत तंबूत आलो. तंबूत परतलो तेव्हा तंबूच्या मधल्या भागात उत्तर प्रदेशातील १०-१२ तरुण येऊन राहिले होते. त्यांच्या बोलण्यावरून पहाटे तीनला उठून रांग लावल्यास दुसऱ्या दिवशी १२ पर्यंत दर्शन घेऊन परत येता येईल असे कळले. तेव्हा तसा बेत करून झोपी गेलो. रात्री कधीतरी पावसाला सुरुवात झाली.

सकाळी लवकरच जाग आली. पाऊस पडतच होता. पण फारसा जोर नव्हता. आवराआवर करून ६ च्या सुमारास आम्ही अमरनाथच्या दिशेने कूच केले. आभाळ



*मंदार देवगावकर तर्फे प्रबोधकांना बलसंपन्न व आरोग्यपूर्ण वाटचालीसाठी शुभेच्छा!*

पूर्ण भरून आले होते. थंडी चांगलीच वाढली होती. रस्त्यात चिखल झाला होता. जिथे मिलिटरीने तपासणीसाठी अडथळे उभे केले होते ते जमीनदोस्त झाले होते. पण माणसांचे लोंढे अमरनाथच्या दिशेने 'जय भोलेनाथ' च्या गर्जनेत निघाले होते. कितीही वाईट हवा असली तरी भोलेनाथ सर्व काही ठीक करेल ही लोकांची श्रद्धा अढळ होती आणि कोणत्याही परिस्थितीत दर्शन करूनच परत जायचे हा निश्चयही. आम्हीही त्यात सामील झालो.

तास दीड तास वाटचाल झाली असेल. चढही बेताचा होता. २-२।। कि.मी. वाटचाल झाली आणि तिथेच थांबली. पुढे माणसांचा डोह तयार झाला होता. डाव्या हाताला २-२।। फूट खाली नदी. उजव्या हाताला डोंगर. मध्ये पायवाटेवर चौपदरी-पाचपदरी रांगा. लांबवर नदीचे रूपांतर हिमनदीत झालेले. त्याच्यापुढे उजवीकडे वळण. चढामुळे लोकांच्या समूहापलीकडचे काही दिसत नव्हते. माणसे खाली उतरून नदीकाठाने डोंगरावरून पाऊलवाटांनी पुढे जायचा प्रयत्न करीत होती. त्याही रांगा थबकून राहिल्या होत्या.

पावसाचा जोर वाढत होता. वातावरणातील भयानकता वाढायला लागली होती. पुढे जाण्याची शक्यता दिसत नव्हती. पुढे ३-३।। कि.मी. बर्फ आहे. २० ते २५ हजार लोक रांगेत आहेत अशी माहिती कानावर पडत होती. काही अनुभवी यात्रेकरूंनी एवढी वाईट हवा आणि परिस्थिती गेल्या १० वर्षात नसल्याचे सांगितले आणि परतण्याचा सल्ला दिला. तेव्हा पाऊल वाटेने किंवा नदीकाठाने पुढं जाण्याचा प्रयत्न करण्याचा मोह सोडून परत फिरण्याचा निर्णय घेतला.

वातावरणाचे रौद्र रुप आता जाणवायला लागले होते. थंडीचा कडाका वाढत होता. हात काकडू लागले होते. परतणाऱ्यांचा प्रवाहही वाढू लागला. अजूनही अमरनाथच्या दिशेने निघालेले लोक भेटत होते. दर्शन झाले का विचारत होते. त्यांना शंकराने प्रत्यक्ष रौद्र रुपाचे दर्शन दिल्याचे सांगत खाली उतरत होते.

पंचतरणीपर्यंत आलो. पंचतरणीच्या



 *आहे अंधार म्हणून वाटे उजेड तो हवा। जगण्याची इच्छा त्याला क्षण प्रत्येकची नवा।*

*With Best Compliments From* - JAISONS ENGINEERING TECHNOLOGY *PUNE.*

पात्रातील वाळवंटात ४-५ घोडे मरून पडलेले दिसले. २-३ घोडे तडफडत होते. आता मात्र परिस्थितीची भयानकता जाणवायला लागली.

पंचतरणी माणसांनी फुललेली होती. परतीसाठी घोडे मिळण्याची शक्यता दिसत नव्हती. कसेतरी २ पिठ्ठू मिळाले. तेही चढाचा रस्ता संपेपर्यंत म्हणजे गणेश टॉपपर्यंतच. एका सॅकचे ५०० रुपये! वातावरणातले गांभीर्य वाढत होते. तेव्हा आता एकच विचार. परतीच्या दिशेने वाटचाल. अनेक यात्रेकरुंनी असाच विचार केला असावा. कित्येकजण घोडे मिळविण्याच्या खटपटीत होते. आम्ही मात्र शेषनागाच्या दिशेने दोन पायांचे घोडे दामटले.

सर्वत्र अंधारून आले होते. थंडी काकडायला लावत होती. पाऊस पडतच होता. पिठ्ठूला कायम बरोबर राहायला बजावले. पंचतरणी ओलांडली आणि चढ सुरू झाला. पंचतरणी ओलांडली आणि चढ सुरु झाला. चालण्यामुळे अंगात ऊब येत होती. सुरुवातीच्या २-३ चढणी गेल्या आणि दाट धुके दाटून आले. कोणाच्या तरी लक्षात आले अरे हिम पडतेय. फारच मजा वाटली. हिमवर्षावाचा पहिलाच अनुभव. बारीक बारीक हिमकण हवेतून पडता पडता नाहीसे होत होते. आमची वाटचाल चालूच होती. रस्ता संपूर्ण चढणीचा. पोटात बेताचेच अन्न त्यामुळे नीलिमा आणि मेघनाची वाटचाल मध्येच थबकत होती.

वाढत्या उंचीबरोबर हिमवर्षावाचा वेगही वाढू लागला. जमिनीवर पडलेले हिमकण दिसू लागले. साठून त्यांचे बर्फात रूपांतर व्हायला लागले. हातावरही कण दिसायला लागले. काठी धरलेला हात बधीर व्हायला लागला. एकमेकांना चोळून अधूनमधून त्यांच्यात ऊब निर्माण करावी लागत होती. सतत बोटांची हालचाल केली नाही, तर ती गोठून जात होती.

महागुणा टॉपवर मिलिटरीच्या २-३ बरॅक्स आणि काही तंबू होते. ते २-३ शे फूट राहिले असतील आणि बर्फवृष्टीचा जोर एकदम वाढला. बरॅक्स आणि तंबू अंधुक दिसायला लागले. बाकीचे तिघे थोडे पुढे गेले होते. घोडे मेलेले पाहून नीलिमाला मानसिक धक्का बसला होता. तिची वाटचाल मंदावली होती. बरॅकपर्यंत शेवटचे १००-१५० फूट तिला अक्षरशः हाताने खेचत नेले. कोणत्याही परिस्थितीत शेल्टरपर्यंत पोहोचायला पाहिजे हा एकच विचार होता. त्याही स्थितीत एकदोनदा मागे वळून बघण्याचा मोह आवरला नाही. ज्या रस्त्यावरून आलो होतो तो रस्ता आणि सगळे डोंगर उतार पांढरेशुभ्र झाले होते. डोंगर शिखरावरच असणाऱ्या बर्फाने संपूर्ण डोंगर झाकून टाकले होते. महागुणाटॉपच्या पलीकडचे सगळे धुक्यात हरवून गेले होते. थोड्या वेळाने बर्फवृष्टीही जरा कमी झाली. तेव्हा न थांबता पुढे जाण्याचा निर्णय घेतला. खरोखरच योग्य वेळी त्या जागी न थांबण्याची प्रेरणा देणाऱ्या परमेश्वराच्या कृपेनेच आम्ही वाचलो. तिथेच थांबलो असतो तर काय झाले असते सांगता येत नाही.

*(भाग दोन -पुढील अंकात)*

**अनिल देशमुख**
श्री स्वामी छाया, नवसह्याद्री, सो.सा., गणेशनगर, पुणे - ५.



प्रायोजक : विश्वकुमार विश्वनाथ आर्किटेक्टस् प्रा. लिमिटेड, पुणे.

# क वि ता

## जगण्याचे गाणे

असे जगणे जगणे
जसे प्रकाशाचे गाणे
काळ्या डोहात फुलती
जसे नक्षत्रांचे कळे!
असे जगण्याचे गाणे
सात स्वरांत गुंफले
सात रंगात रंगले
पायी धुंद रुणझुणे!
असा जगण्याचा ताल
पावलांत नाचे आज
आशा झाली अलगुज
घुमे मनी पखवाज!
वारा जणू भणाणतो
उभ्या पिकात घुसतो
भरारतो, सणाणतो !
हवे जगण्यात भान
जलभरल्या ढगांचे
काळ्या मातीच्या तपांचे
गाणे मातीच्या गंधाचे...

**– सुहासिनी अ. देशपांडे**
(अर्चना सोसायटी, एरंडवणे, पुणे)



## 'आवाहन'

असत्य बसले मिरवित टेंभा
त्या नौकेच्या उंच शिडावर

वादळ होऊन या हातांनो
जळमट काळे न्या दूरवर

खोट्या शपथा पुतळ्यापाशी
त्या ढोंग्यांचे ओठ बोलती

प्रलय घेऊन या श्वासांनो
रावण सारे न्या सरणावर

मुक्या भाबड्या गळा रुतूनी
रक्तमाखले हात जयांचे

त्या जुलमांचा काळ होऊनी
तुफान उठवित या हातांनो

**– स्वप्निल पोरे**
(१२८० सदाशिव पेठ, पुणे ३०.)

## असं चित्र काढायचंय मला

निळं निळं स्वच्छ मोकळं आभाळ
पांढऱ्या ढगाचा मोठ्ठा हत्ती

त्याच्या शेजारी गुबगुबीत ससा
त्याच्या खाली हिरवं भरगच्च झाड

त्याला अडकलेला हिरवा जांभळा पतंग
आईच्या लाल साडीवरची पांढरी नक्षी

बागेतल्या पिवळ्या फुलांच्या चांदण्या चांदण्या
आणि किती किती रंगांची फुलपाखरं

– असं चित्र काढायचंय मला
कोण देईल मला सारे रंग?

कोण देईल एवढा मोठा कागद?
– तोवर मी आपला मनातच
हे चित्र काढीन अलगद, अलगद!

**– सरिता पदकी**
(दशभुजा गणपतीजवळ, कर्वेरोड, पुणे ४.)

*हलके हलके हसते गळते तरूचे पानन् पान। पानझडीत या ऐका आता शिशिर ऋतुचे गान।*

कथा

# हिरा मोती

–डॉ. लीला दीक्षित

गणेश आज अगदी खूष होता. कारण त्याचे बाबा आणि राघव गडी बैलांची नवी जोडी आणण्यासाठी मल्हारपेठेला जाणार होते. 'नवीन जोडी आणणार म्हणजे, बाबा काळू बाळूला विकणार की काय?' गणेशला मोठाच प्रश्न पडला. गणेश अगदी लहान असल्यापासून काळू बाळू त्याचे अगदी मित्र होते म्हणून मल्हारपेठला बाबा व राघव काळू बाळूला बरोबर न घेता दोघेच निघालेले पाहून तो खूष झाला. तरीसुद्धा मनात शंकेची पाल होतीच. 'नाही ना विकणार काळू–बाळूला?' शेवटी त्याने हिय्या करून बाबांना विचारलेच – प्रश्न मात्र त्याने चतुराईने विचारला –

''बाबा, हिरा मोती आले की....

''हिरामोती कोण?''



''म्हणजे काय बाबाऽ तुम्ही मल्हारपेठला गुरांच्या बाजारासाठी जाताय ना?''

''मग त्याचं काय?''

''मग तिथे हिरामोती भेटतीलच ना तुम्हांला?'' बाबा खोऽ खोड हसले.'' म्हणजे आपल्या नवीन बैलजोडीचे बारसे पण केलेस तू? छान आहेत नावे हिरा–मोती''

''सुदेशनेच सुचविली. म्हणाला, हिरा मोती नावाचे बैल खूप स्मार्ट असतात.''

''स्मार्ट?''

''स्मार्ट म्हणजे शूर हो! अगदी वाघाशीसुद्धा लढतात.''

''लढतील! लढतील!–'' बाबा हसून म्हणाले.

''पण मुख्य प्रश्न विचारायचा राहिलाच की!'' गणेश पुढे म्हणाला–

''बाबा हिरामोती आल्यावर काळूबाळूला कुठे बांधायचे?''

''प्रश्नच आहे खरा! – ''

गणेश कासावीस झाला, ''एक विचारू बाबा! नाही ना विकणार तुम्ही काळूबाळूला'' गणेशने एका श्वासात



प्रायोजक : कौशिक एंटरप्राईजेस, पुणे ३८.

सारे विचारले व तो बाबांकडे उत्सुकतेने पाहू लागला.

"नाही रे राजा, अरे काळूबाळू गेली बरीच वर्षे आपल्याकडे मन लावून काम करताहेत. अगदी बछडे होते तेव्हा आणले होते त्यांना. तुझा जन्मही झाला नव्हता तेव्हा, आणि म्हातारे झाले म्हणून घरातल्याला का कुणी विकतं? वेडा कुठला!"

" पण बाबा ते काम करणार नाहीत, आणि त्यांना बांधणार तरी कुठे?"

"वाडीत विहिरीच्या पलीकडे मोठा मोकळा दडगा आहे ना; तेथे काढू एक झकास पडवी. कारण काळू बाळूला आता फक्त रहाटाला जुंपायचेच काम आहे. तेसुद्धा एक दिवसाआड -"

गणेश सारे ऐकून अगदी खूष होता. बैलांची नवीन जोडी घरी येणार हे पाहून तर तो हरखूनच गेला होता.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी राघव आणि बाबा घरी आले. गणेश व सुदेश धावत अंगणात गेले. बाबांच्या मागे हातात कासरा अन् त्याला बैलांची जोडी होती. उमदे, चपळ, दोघांचा रंग पांढराशुभ्र होता. एकाच्या कपाळावर काळा चांदवा होता. तर दुसऱ्या बैलाच्या वाशिंडाच्या मागे काळा पट्टा होता. दोघांचीही शिंगे काहीशी आखूड पण अणकुचीदार आणि सारखी होती. पाय मजबूत आणि घट्ट होते. मानेखालची पोळी डौलदार होती. दोघांचे डोळे मोठ्ठे अन् पाणीदार होते. कान टवकारलेले होते. ती देखणी, उमदी जोडी गणेश पाहातच राहिला. आईने पुढे येऊन भाकरीचा तुकडा ओवाळून टाकला अन् गणेश भानावर आला -

"बाबा, मी धरू कासरा?"

"नको रेऽ अजून ओळख नाही तुझी. होईल हळूहळू. गरीब आहेत दोघे."

"बाबा त्यांची नावे त्यांना सांगायला हवीत."

"मग सांग ना...."

गणेश बिचतकच पुढे झाला. अंगणात डालगे होते. त्यामध्ये हिरव्या पेंड्या बांधून ठेवल्या होत्या. त्याने एक हिरवी पेंडी उचलली आणि पुढे केली. हळूच त्यांच्या मस्तकावर हात फिरवला. त्यांच्या मस्तकावरील चांदवा त्याला फार आवडला. त्याला स्पर्श करीत गणेश म्हणाला-

"हिराऽ"

हिराने कान टवकारले,

"आणि तुझे नाव मोती" दुसऱ्या बैलावर थाप मारीत गणेश म्हणाला. सुदेशनेही बिचकत बिचकत पुढे येऊन त्याला हात लावला. त्यांनी शिंगे जराशी हलवली. मनोमनी ते समजले असावेत 'आपली दोस्तमंडळी दिसताहेत!' नवीन जोडी आणली याचे गणेशला केवढे अप्रूप! नंतरचा एक आठवडा शाळेतही सर्व मित्रमंडळी हिरामोतीला पाहून गेली.

पावसाळा सुरू झाला. तोपर्यंत घरापुढच्या गोठ्यात हिरामोती बांधलेले असत. गणेशची त्यांच्याशी अगदी दोस्ती झाली होती. आज मात्र तो जरा हिरमुसला होता. त्याचं असं झालं. गणेशच्या बाबांची शेती घरापासून पाच मैल लांब-पाटपन्हाळे येथे होती. तेथेही छोटा गोठा होता व गोठ्यालाच लागून कधीमधी राहण्यासाठी

 *नाद कानावर पडे घुंगरांचा, सूर मिसळे त्यामध्ये पावरीचा। मोट सुटली मोकळे बैल झाले, गडी सारे एकत्र जमुनी आले।*

प्रायोजक : मे. ओम कन्स्ट्रक्शन, प्रोप्रा. माणिकराम हळबे, पुणे ४११ ०३०.

एक खोली होती. पावसाळा सुरू झाला की बैल पाटपन्हाळ्याला राहायचे लावणी होईपर्यंत. सोबतीला राघव राहायचा. बाबा सकाळी जाऊन सायंकाळी घरी यायचे. त्यामुळे आता रोज आपल्याला हिरामोती दिसणार नाहीत याचे दु:ख गणेशला होत होते; पण नाईलाज होता. गणेशला वेगळीच काळजी होती. हिरामोतीला तशी सवय नव्हती. कधी उघड्या रानात रात्री अपरात्री वाघरूही यायचे तेथे. हिरामोती घाबरतील, परंतु बाबांनी गणेशची समजूत घातली. ''हिरामोती कसे आहेत पाहिलेस का तू? एखाद्या हत्तीची ताकद आहे त्यांच्यात. वेळ आली तर वाघरू काय घेऊन बसलास मोठ्या वाघाला लोळवतील दोघेजण!''

पाटपन्हाळ्याला घराच्या भोवती तारेचे मोठे कंपाऊंड होते. त्यामुळे रात्री राघव घराचे दार लोटून घ्यायचा आणि हिरामोती आवारात मुक्तपणे हिंडत असायचे. दावणीला बांधायची गरज नसायची.

अशीच पौर्णिमेची रात्र होती. अंगणात लख्ख चांदणे पडले होते. राघव झोपण्याच्या तयारीत होता. इतक्यात त्याला उग्र वास आला. त्याने ओळखले. जवळच रानात वाघ हिंडत असणार. हिरामोतीला दावणीला गोठ्यात बांधावे हे बरे म्हणून दरवाजा उघडून तो अंगणात येतो तो आवाज आला.

''धप्प--''

त्याने चमकून पाहिले. दक्षिण दिशेची कुंपण थोडी उसकटल्याने खाली आली होती. तिथे कुंपणाची उंची काहीशी कमी होती. बरोबर तिथून बिबट्याने मोकळ्या अंगणात उडी घेतली होती. आता अंगणात जाणे शक्यच नव्हते. जिवाच्या भीतीने राघवने दार लावून घेतले आणि तो खिडकीतून बाहेर अंगणात पाहू लागला.

बिबट्याचा वास हिरामोतीला आला होता. ते सावध झाले. दोघेही तटकन उठले. पायाखालची जमीन उकरली. शेपटी ताठ झाली. दबकत दबकत बिबट्या मोतीच्या बाजूने सरकत होता. याचे भान हिराला आले. तो सावधपणे बिबट्याच्या शेपटीच्या बाजूला हळूच गेला. बिबट्याने हिराच्या दिशेने झडप घेतली मात्र; मोतीने दोन्ही शिंगे किंचित खाली करून अशा वेगाने मुसंडी मारली की हिराच्या अंगावर झेप घेणाऱ्या बिबट्याच्या मागच्या पायाच्या फऱ्यात मोतीची शिंगे चांगलीच रुतली व तो धडपडत हिराच्या पायाशी कोसळला. हिराही आता सावध झाला होता. तो किंचित मागे झाला. बिबट्याला हे सारे अनपेक्षित होते. त्या जंगलाच्या बादशहाला शिकार करायची माहिती होती. परंतु आपल्यावर कोणी असा हल्ला करील याची त्याला सुतरामही कल्पना नव्हती. संतापून त्याने मान फिरवली आणि सर्व ताकदीनिशी तो मोतीवर झेप घेण्याच्या पवित्र्यात पुढे सरकू लागला. आता हिरा पुढे झाला. पायाने माती खुरपली; शिंगे जमिनीत घुसळली आणि त्यानेही मोतीवर झडप घालणाऱ्या बिबट्याला मागून मुसंडी मारली. परंतु यावेळेला ती थोडी चुकली आणि बिबट्याने मोतीच्या मानेखालचा लचका तोडला. मोती खाली कोसळला. बिबट्या थोडा मागे सरकून पुढे काय पवित्रा घ्यावा या विचारांत उभा होता. त्याचे गोट्यांसारखे



प्रायोजक : मे. आर. डी. वीरकर आणि कं., वीट कारखानदार, सिंहगड रस्ता, पुणे.

घारे डोळे चांदण्यात चमकत होते.

हे सारे दृश्य खिडकीतून राघव पाहात होता. आसमंतात एक दोन कोसावर एक असाच वाडा व शेती होती. परंतु रात्रीच्या नीरव शांततेतही इतक्या लांब ओरडून आवाजही जाणे शक्य नव्हते. गजावर एक दोन वेळा जोरात खडखड काठीचा आवाज करून त्याने पाहिले. पण त्या क्रूर हिंस्त्र बिबट्यावर त्याचा काहीच परिणाम झालेला नव्हता. दोन-तीन महिन्यांपूर्वी आणलेले हे सोन्यासारखे बैल.... छे.... त्याला काहीच सुचत नव्हते. अगतिकतेने पहाण्यापलीकडे राघवच्या हातात काहीच नव्हते. तो श्वास रोखून पाहात होता. मोती विव्हळत खाली पडला. तशी मागच्या बाजूला असलेला हिरा मोतीजवळ गेला. मायेने त्याने जखमेवरचे त्याचे रक्त चाटून घेतले. त्या उष्णस्पर्शाने तो जरा सावरला. हिराने शिंगाने हलकेच पोटाला स्पर्श केला. मोती जीवाच्या कराराने उभा राहिला. त्याची खात्री झाली, आता आपण एकटे नाही. दोघेही आता पावित्र्यात उभे राहिले. शिंगे रोखलेली, नाक फुरफुरलेले आणि शेपटी ताठ उभारलेली. त्यांचा तो विलक्षण आविर्भाव पाहून बिबट्याही किंचित गोंधळला आणि थोडा थोडा मागे सरकू लागला. तो ज्या दिशेने सरकत होता तिथेच मागच्या बाजूला एक कोरडी विहीर होती. हिरा आणि मोतीने शिंगे रोखून एकाचवेळी बिबट्याला जोरात मुसंडी मारली. धडक इतकी जबरदस्त होती की, बिबट्याच्या मागचा, चिखल लिंपलेला दगडाचा कट्टा खाली आला आणि बिबट्या धाडकन् विहिरीत कोसळला. विहीर चांगली दोन तीन पुरुष खोल होती. झाल्या प्रकाराने हिरा मोतीही गोंधळले. घाबरले. घडंल होतं अनपेक्षित. नियतीच मदतीला धावली होती. विहिरीत कोसळता कोसळता बिबट्याने प्राणांतिक डरकाळी फोडली. राघवने डोळे गच्च मिटून घेतले.

मिनिटभर झाले तर काहीच आवाज नाही म्हणून राघवने डोळे उघडले. सारा प्रकार त्याच्या लक्षात आला. विहिरीतून बिबट्याच्या डरकाळ्या येतच होत्या. तो पडवीचे दार उघडून बाहेर आला. हिरा मोती जवळ गेला. त्यांना गोंजारले. राघवच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्याने एका करवंटीत उंडेलतेल ओतले. त्यामध्ये हळद कालवली आणि मोतीच्या जखमेला हळुवार हाताने लावली. निर्गुडीच्या पानाने जखम बांधली. हिराला फारसे लागले नव्हते. थोडे खरचटले होते. तेथेही उंडेलहळदीचा लेप लावला आणि तो दोघांच्याही पाठीवर हळुवारपणे हात फिरवीत राहिला. त्या स्पर्शाने त्या मुक्या जीवांनाही दिलासा वाटला. दोघेही खूप दमले होते. राघवने कणगीमधील पायलीभर नाचणी काढली. चूल पेटवली आणि गरमगरम घट्ट अंबील बनवली. फागोरीच्या खोऱ्यात दोघांपुढे ठेवली. दोघांनीही आंबील भराभर फस्त केली आणि ते जरासे तरतरले.

पहाट झाली. दोन कोसावर असलेल्या वाडीचा किसन गाडी घेऊन चालला होता. घुंगरांचा आवाज आला तसा राघव पुढे झाला-

''अरे ओ, किसन वाईच थांबव गाडी.''

''काय म्हणून.''



प्रायोजक : परांजपे पोल्ट्री फार्म, दुर्गामाता मंदिरामागे, सांगली.

''अरे अकरित घडलयां.''

'अकरित?''

''हिरामोतीने वाघाशी झुंज दिली बग.''

''कुठल्या शिणमातले सांगायतोस बाबा? गुहागरला टी.वी. आला न्हवं?''

''कसला शिणीमा, उतर खाली. सोताच पहा की!''

किसन खाली उतरला. जखमी हिरामोतीना पाहिले आणि विहिरीत डोकावला आणि त्याची भंबेरीच उडाली. त–त–प.प... करू लागला.

''त..त..प...प... काय करतोस? या दोन बछड्यांनी केल्येय ही दशा या वाघाची आणि तू नुसता विहीरीतल्या वाघाला भितोस?''

किसनला माहीत होतं. राघव आता शूर झालाय. त्याचीही बोबडीच वळली असणार. तो नुसताच हसला.

'' हे पहा किसन गुहागरला जाऊन धन्यास्नी बातमी दे.''

''देतु....देतु' करीत किससने बैल पिटाळले. त्यांच्या घुंगुरमाळा वाजत होत्या. कितीतरी वेळ राघव तिथेच उभा होता. हिरामोती वडाच्या झाडाखाली विसावले होते.

तास दीडतासाने गुहागरहून पाचपन्नास





चि. हृषीकेश कुलकर्णीकडून प्रबोधकांना शुभेच्छा!

माणसे घेऊन धनी, गणेश आले. जीप घेऊन इन्स्पेक्टर घळसासीही आले. साऱ्यांच्या तोंडी हिरामोतीचा पराक्रम होता. विहिरीत बिबट्याच्या डरकाळ्या चालूच होत्या. लोकांना मागे हटवताना पोलिसांची पुरेवाट झाली. दुपारी दोनच्या सुमारास जीप आली. रत्नागिरीहून वन्यजीवरक्षक आले होते. त्यांनी चतुराईने बिबट्याला विहिरीतून काढले. बिथरलेल्या बिबट्याला पिंजऱ्यात अडकविले आणि सारा लवाजमा परत रत्नागिरीच्या दिशेने रवाना झाला.

आठ दहा दिवसात औषधोपचाराने मोती बरा झाला. हिरामोतीची डौलदार जोडी शेतात नांगर ओढू लागली. पोळा नसूनसुद्धा आईने पुरणपोळी केली. हिरामोतीला ओवाळले व त्यांना गोड गोड खाऊ घातले. गणेशचे डोळे सारखे पाणावत होते.

दिवाळी झाली. पाटपन्हाळ्यांच्या शेताची कापणी मळणी सारी कामे व्हायची होती. म्हणून हिरामोतीची परत पाटपन्हाळेला रवानगी झाली. राघव राखणीला होताच. दिवस मावळायच्या आत हिरामोतीला गोठ्यात न विसरता बांधायचे असे बाबांनी राघवला बजावून सांगितले होते. मागचा वाघाचा अनुभव ताजा होता. मळणीच्या आणि कापणीच्या दोन्ही दिवशी बाबांचा मुक्कामही पाटपन्हाळ्यालाच होता.

यंदा पीक उत्तम झाले होते. कापणी झाली. मळणी झाली आणि अंगणात धान्याची रास पडली.

राघवने सारी पोती भरली. उद्या गाड्या येऊन पोती गुहागरला जाणार होती. हिरामोतीची एक गाडी होती. अजून दोन गाड्या येणार होत्या. कामावरचे गडी घरी परतले. रात्र झाली. गणेशचे बाबा म्हणाले–

''राघव, उद्याच जाऊ एकदम. आता झकास झुणका भाकर बनव. इथेच खाऊ आणि झोपू.''

दोघेही आनंदात होते. कष्टाचे फळ आले होते. राघव नावाला नोकर होता. घरचाच होता तो. मळणी झाल्यावर एक पोतं त्याच्या घरी जात असे. धनी कनवाळू होते. पीक यंदा छान आले होते. जेवून दोघेही आनंदात झोपी गेले. झोपताना गणेशचे बाबा राघवला म्हणाले,

''जरा जागरूक राहायला हवं. धान्याची पोती अंगणात आहेत.''

''व्हय जी. तुमी नका काळजी करू''

पहाटेची वेळ. दोघेही गाढ झोपेत होते. बाहेर काही खुसखुसले म्हणून राघवने मान करून खिडकीतून पाहिले आणि तो अवाक्‌च झाला.

रस्त्यावर गाडी उभी होती आणि घोंगडी पांघरलेली चार माणसे पोती उचलून गाडीत टाकीत होती. त्यांच्या हातात फरशा होत्या. करावे तरी काय? राघवने हळूच धन्याला उठवले. सर्व प्रकार गणेशच्या बाबांच्या लक्षात आला. त्यांनी राघवला हळूच खूण केली. ''गोठ्यात जाऊन हिरामोतीला सोड.'' हिरामोती सुटले आणि मोठ्याने डरकाळी फोडीत अंगणात आले. वाघाच्या झालेल्या प्रकाराने हिरामोतीची पंचक्रोशीत दहशतच झाली होती. त्यातील दोन चोरटे गडी पण गडबडले. पटकन गाडीत जाऊन बसले आणि त्यांनी गाडी सुरू केली. गडी गाडीच्या दिशेने धावत सुटले. आता गणेशच्या बाबांना व राघवला बळ आले. ते त्या दोघांमागे धावले. परंतु एकाने हातातली फरशी राघवकडे



प्रायोजक : स्वस्तिक बिल्डर्स (अनिल लोढा, राजेंद्र गोठी) मखमलाबाद नाक्याजवळ, नाशिक ☎५१३५९०

फेकली ती त्याच्या पायाला वर्मी लागली. पुढे पळणारे बाबा राघवला सावरायला मागे आले. परंतु त्या धावणाऱ्या माणसावर मोतीने अशी मुसंडी मारली की शिंग त्याच्या डाव्या बरगडीतून बाहेर आले. तो जीवाच्या आकांताने ओरडला. इतर माणसांनी त्याला गाडीत खेचून घेतले पण मोतीने त्याचे मुंडासे शिंगाने उडवले. तो दोन्ही शिंगावर मिरवीत तो गाडीच्या मागून पळू लागला. पहाटेची वेळ. रस्त्यावर तशी सामसूम. मुख्य रस्त्यावर मोती आला. त्याचवेळेला चिपळूणच्या दिशेने इन्स्पेक्टर घळसासी जीपने गुहागरला चाललेले. बरोबर दोन पोलिस. मोती रस्त्याच्या कडेला उभा. सकाळच्या वाहत्या वाऱ्यात त्याच्या शिंगाला गुंतलेले लाल मुंडासे वाऱ्यावर फडकत होते. काहीतरी घडलंय खास! मोतीला त्यांनी ओळखले. ते खाली उतरले. त्याच्या पाठीवर थाप मारून म्हणाले –

''चलो मोती??''

पाटपन्हाळ्याच्या वाड्याशी जीप थांबली. इन्स्पेक्टर घळसासी स्वत: तेथे उतरले व जीप दोघा पोलिसांना सांगून वाडीकडे पिटाळली. तो एकच मार्ग होता येथून निसटण्यासाठी. राघव जखमी झालेला होता. गणेशचे बाबा जे करता येईल ते करीत होते. अर्ध्या तासातच चोरांच्या मुसक्या बांधून पोलिस जीप घेऊन परत आले. जीपच्या पुढच्या भागात राघवला बसवून त्याला डॉक्टरकडे नेणे महत्त्वाचे होते. जवळच नातूनगर होते. जीप राघवला तेथे सोडून आली. दवाखान्यातील डॉक्टर गणेशच्या बाबांचे मित्रच होते. चोरांच्या मुसक्या बांधून त्यांनी जीपमध्ये बसवलेले होते. पुढच्या सीटवर इन्स्पेक्टर घळसासी बसले आणि म्हणाले –

''तुम्ही येणार का?''

''मला नाही येता येणार. पण एक काम करणार का साहेब.''

''हं बोला.''

''धान्याची पोती अजून इथे आहेत. सर्वांची व्यवस्था लावून सर्वांना घेऊनच मला घरी घेऊन यायचंय. तुम्ही घरी निरोप द्या आणि दोन गडी पाठवा तातडीने.''

''करतो व्यवस्था. काळजी नको करू. पण गणेशचे बाबा तुमचे हे हिरामोती अजबच म्हणायचे!''

त्यांनी हिरा मोतीकडे पाहिले. वडाच्या सावलीत दोघेही झुलत होते. रवंथ करीत होते. मोतीच्या शिंगावर मुंडासे तसेच लोंबत होते. इन्स्पेक्टर घळसासी उतरले आणि त्यांनी मुंडासे काढून त्याचे गुंडाळे करून ते काखोटीला मारले. दोघांच्या पाठीवर थाप मारीत ते म्हणाले –

''ब्रेव्हो! हिरा मोती!''

''त्यांना फारच समजणार तुमची शाबासकी''

बाबा हसत म्हणाले.

''नक्कीच कळली असणार! पहा कसे ऐटीत झुलताहेत.''

जीप सुरू झाली. प्रेमाने गणेशचे बाबा हिरामोतीच्या पाठीवर हात फिरवू लागले. धन्याचा तो प्रेमळ स्पर्श त्यांना जाणवला. दोघेही बाबांचे हात चाटू लागले.

●●

**डॉ. लीला दीक्षित**
डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे २९.



प्रायोजक : नातू चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे

# तुम्हाला माहीत आहे काय?

वर्ष ५ अंक २ मधील विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे

**प्र.१ला – मॅगसेसे पुरस्कार म्हणजे नेमके काय? त्या पुरस्कारासाठी व्यक्तींची निवड कोणत्या निकषांवरती करतात? भारतातल्या कोणाकोणाला या वर्षीचा पुरस्कार जाहीर झाला आहे?**

उत्तर – मॅगसेसे पुरस्कार हा आंतरराष्ट्रीय पातळीवरील सन्मानाचा असून, हा पुरस्कार नोबेल पारितोषिकाच्या समान समजला जातो. १९५७ साली विमान अपघातात ठार झालेल्या फिलिपाईन्सचे अध्यक्ष रेमन मॅगसेसे यांच्या स्मृती–प्रीत्यर्थ दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो. पुरस्कारकर्त्याला ५०,००० डॉलर्स पुरस्कार प्रीत्यर्थ मिळतात.

आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट समाजसेवा केल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात येतो.

या वर्षीचा मॅगसेसे पुरस्कार टी.एन.शेषन यांना उत्कृष्ट प्रशासकीय सेवा केल्याबद्दल आणि परमपूज्य पांडुरंगशास्त्री आठवले यांना जात–पात, पंथ–भेद न मानता सर्वांना ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवून लोकांना एकत्र आणण्याचे काम केल्याबद्दल देण्यात आला आहे.

या पुरस्काराचे पहिले भारतीय विजेते सरदार वल्लभभाई पटेल हे होते.

**प्र.२ : ॲटर्नी जनरल हे पद काय आहे? त्यांच्याजवळ अधिकार कोणते असतात?**

उत्तर : भारताचा सर्वोच्च प्रमुख सरकारी वकील म्हणजे ॲटर्नी जनरल होय. ॲटर्नी जनरलचे अधिकार : (१) ॲटर्नी जनरलने घोषित केलेला निर्णय हा अंतिम निर्णय समजला जातो. (२) प्रसंगानुसार राष्ट्रपतीला किंवा सरकारला योग्य तो सल्ला देण्याचा अधिकार त्याला असतो आणि त्या सल्ल्याचे पालन करणे हे राष्ट्रपतीला किंवा सरकारला बंधनकारक असते. (३) लोकसभेचा सभासद नसताना वेळेवर लोकसभेच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याचा त्याला अधिकार आहे आणि त्या वेळीदेखील त्याने दिलेला निर्णय हा अंतिम निर्णय समजला जातो. (४) कोणत्याही प्रमुख बाबतीत तो सरकारचे म्हणणे मांडतो.

**प्र.३ : डॉक्टर बी.पी. B. P. तपासतात त्यावेळी त्याचे दोन आकडे असतात. ते नेमके काय दर्शवितात?**

उत्तर : डॉक्टर बी.पी. तपासतात तेव्हा जे दोन आकडे असतात, ते जास्तीत जास्त रक्तदाब व कमीतकमी रक्तदाब दर्शवितात. जास्तीत जास्त रक्तदाब दर्शविणाऱ्या आकड्याला systolic B. P. (सिस्टॉलिक ब्लड प्रेशर) म्हणतात. तर कमीत कमी रक्तदाब दर्शविणाऱ्या आकड्याला Distolic B. P. (डायस्टॉलिक ब्लड प्रेशर) म्हणतात.

निरोगी व्यक्तीत याचे प्रमाण जास्तीत जास्त 120mmHg आणि कमीतकमी 80mmHg एवढे असते.

उर्वरित उत्तरे पुढील अंकात



'Save Trees, Reuse Paper' - Dr. H. V. GANALA, Pune.

नाट्यछटा

# आली सुट्टी! गेली सुट्टी!

**– शैलजा देशमुख**

''सोने, आता उठतेस, का अंथरुणातून ओढून काढू बाहेर?'' ''या आईला काही म्हणता काही समजत नाही. काल परीक्षा संपली आणि सुट्टी सुरू झाली. आज चांगलं भरपूर झोपायचं ठरवलं होतं. म्हणजे रोज काही कमी झोपते असं नाही बरं का. पण होतं काय रोज सकाळी आपलं आईचं एकच वाक्यं कानावर पडतं– 'मन्या, उठा आता, अभ्यास करायचाय ना परीक्षेचा?' मग काय अस्मादिकांची स्वारी धडपडत जागी होत. आज मात्र तसं नाही हं! पण कसंच काय, आधी झोपच येईना आणि आता छान झोप लागली तो आली लगेच उठवायला!''

''काय म्हणतेस, आजपासून सकाळी सुट्टीभर संस्कार वर्गाला जायचं?'' शी मला नाही बाई असले वर्ग आवडत. हाताची घडी तोंडावर बोट; सगळं कसं चाकोरीबद्ध! जे शाळेत तेच इथे. आता काय सगळ्यांनी स्तोत्रं पाठ करायची; मग काय तर हस्तकलेचा तास, चित्रकलेचा तास, अगदी खेळायचंसुद्धा ठरलेल्या वेळात, तेही ठरलेले खेळ! त्यापेक्षा गेल्या वर्षी आजोबांकडे गेले होते तेव्हा आजोबांचं ऐकून ऐकून पुरुषसूक्त नकळत पाठसुद्धा झालं. त्या क्लासमध्ये मुद्दाम पाठांतर करायला लागलं ना की अगदी जांभया यायला लागतात. झालंच तर तलावातलं ते शास्त्रशुद्ध पोहणं. आज काय म्हणे दांड्याला धरून शंभरवेळा ठराविक प्रकाराने पाय हलवा, हात हलवा, त्यापेक्षा मामाकडे नदीवर डुंबायला किती मजा येते.''

आणि सुट्टीत मला काय करायचंय विचारावं की नाही आई–बाबांनी? सरळ आपलं दोन–तीन क्लासचे पैसे भरून टाकलेत. मी मुळीच जाणार नाही जा! आम्हांला सुट्टी नको मनासारखी घालवायला? त्यांना वाटतं मला काहीच समजत नाही. आमचा व्यक्तिमत्त्व विकास व्हायला हवाय ना!

'काय रे दादा' काय म्हणतोस, ''टी.व्ही. मोठ्याने लावू नका?'' हा दादा कॉलेजला गेल्यापासून सारखी पंचाईत. त्याची परीक्षा आणि आमची सुट्टी एकदम. सोने, गडबड करू नकोस, मैत्रिणींना बोलावून धुडगूस घालू नकोस! हे करू नकोस न् ते करू नकोस! झालंच तर याची परीक्षा म्हणून सगळी कामं आमच्याच गळ्यात! ते काही नाही परीक्षांच्या वेळा बदलत नसतील तर आमच्या सुट्टीची वेळ तरी बदला म्हणावं! जरा कुठे मोकळेपणाने हुंदडायची सोय नाही.

खरं म्हणजे सुट्टीत छान पुस्तकं वाचायची असं ठरवलंय. शेवटच्या तासाला मराठीचे सर म्हणाले होते. सुट्टीत खूप खूप वाचा! ऐकताना कसं छान छान वाटलं; पण गंमत अशी की, काय वाचावं ते कुणी सांगतच नाही. वाचावं झालं कोणतं तरी पुस्तक



शिरीष पोंक्षे व प्रसाद पुरंदरे यांच्याकडून प्रबोधकांना शुभेच्छा!

घरातलंच! आमच्यासाठी म्हणून तशी वेगळी पुस्तकं, मासिकं कुणी आणतं का?

'काय म्हणता बाबा', आतल्या खोलीत वाचत बसू? हो-माहितेय तुमच्या गप्पा मी ऐकू नये म्हणून म्हणताय ते! मी काय लहान आहे का आता? आणि आमच्याशी स्वतंत्र गप्पा मारायला मात्र कुण्णा कुण्णाला म्हणून वेळ नसतो. कधीही आईला काही सांगायला जा- तिचं आपलं ठरलेलं- 'आता नको रे सोन्या, मी दमलेय, थोड्या वेळाने!' आणि बाबा-त्यांना तर कामातून कधी फुरसतच नसते. त्यापेक्षा गावाहून आजी-आजोबा आले की कित्ती मजा असते बाई!

त्यांच्याजवळ वेळच वेळ असतो. आणि लाड तरी किती! खरंच ग आई, 'आजोबांना बोलावूया का आपल्याकडं राहायला?' काय म्हणतेस, 'सगळ्यांच्या परीक्ष होऊ देत?' म्हणजे आजोबांचं येणं काही खरं नाही- हो, मला माहिते आजोबा आले की आई कशी गूपचूप वावरत असते. म्हणजे रागवत नाही पण खुशीतही नसते. झालंच तर आजोबाही गावाला असतात तसे मोकळे नसतात.

'ए आई, या रविवारी आम्ही मैत्रिणी सिंहगडावर जाणार आहोत. जाऊ ना ग?' 'काय म्हणतेस- बाबांना विचार म्हणून?' अशा मोक्याच्या वेळी आईचं उत्तर ठरलेलं- मग आमचा जीव आपला उगीचच खालीवर; बाबा हो म्हणतात की नाही म्हणून!

आणि एकदाची का बाबांनी परवानगी दिली तरी आईचा निघेपर्यंत मार्गदर्शनाचा ससेमिरा- 'लवकर या हं परत, काही तरी खाऊनका, पैसे नीट ठेवा, सावकाश चढा, गडावर टोकाला जाऊ नका-एकत्र जा-सांभाळून या. अलाणे आणि फलाणे! 'ए आई, तुझ्या अशा सतराशे साठ सूचना सुरू झाल्या ना की अस्साराग येतो किनई-मी काय आता कुकुलं बाळ आहे का?'

सुले, काय म्हणतेस आज एक तारीख? सुट्टी संपतसुद्धा आली. बरं झालं बाई, नाहीतरी कंटाळाच आलाय आता. कधी एकदा शाळा सुरू होतेयसं झालयं. आता शाळा सुरू झाली की होमवर्कची कटकट असते रोजरोज, झालंच तर बाईंचा अभ्यासावरून ओरडा.... आठ तास आम्ही आपली 'मुकी बिचारी कुणी हाका!'

.... असो तरीही दिवस कसा भुर्रऽऽकन उडून जातो नाही!

नाहीतर ही कुंभकर्णाच्या जांभईसारखी लांबलचक पसरलेली सुट्टी - सुरू होईपर्यंत नुसता ध्यास लागतो जीवाला- पण संपत आली की कधी एकदा शाळेत जातोयसं वाटतं. या सुट्टीपेक्षा आठवड्यातून एकदाच येणारा रविवारच बरा! आणि खरं तर मैत्रिणींच्या घोळक्यात घालवलेली अर्ध्या तासाची रोजची मधली सुट्टीच सगळ्यात खरी!

●●

**प्रा. शैलजा देशमुख**
बी-७, गुरुराज सोसायटी,
पद्मावती, पुणे ३७.



छात्र प्रबोधनच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा! 'हेजीब' सौमित्र गोसावी, पुणे.

# वेताळाच्या ज्योती

*– डॉ. हेमंत लक्ष्मण विंझे*

‘‘तुम्हा डॉक्टरांचा देव–धर्म, भूतं–खेतं, मृतात्मे, अशा गोष्टींवर विश्वास नसतो, पण मी तुम्हांला अमावस्येच्या रात्री आमच्या गावच्या स्मशानात घेऊन जाईन. तिथं अमावस्येला भुतं नाचतात! भुतांचा तो नाच तुम्ही स्वत:च बघा. म्हणजे मग तुमचा भुतांवर विश्वास बसेल! हां मात्र एक अट आहे. स्मशानात मी एका विशिष्ट ठिकाणी एक गोल रिंगण आखून देईन. त्या गोलातच तुम्ही उभे राहा. त्यामुळे तुम्हाला भूतबाधा, किंवा कसली इजा होणार नाही!’’


माझ्या परिचयाच्या एका गृहस्थांनी, गप्पांच्या ओघात मला ही माहिती सांगितली.

‘‘स्मशानात भुतं नाचत असताना तुम्ही स्वत: ती पाहिली आहेत काय?’’ मी त्यांना प्रश्न केला.

‘‘होय तर! मी स्वत: अनुभव घेतलाय!’’

निरांजनातली ज्योत कशी दिसते, तसे दिसतात ते’’

माझ्या मनात विचार आला, की निसर्गात अनेक चमत्कार घडत असतात. ज्या चमत्कारांमागील कार्यकारणभाव आपल्याला समजत नाही, अशा चमत्कारांना आपण ‘‘दैवी चमत्कार,’ ‘भुताटकी’, असं म्हणतो. त्यामुळे समाजात अंधश्रद्धा निर्माण होतात.



विशेषत: खेडेगावात तर अंधश्रद्धा जरा जास्तच असतात. बुद्धिप्रामाण्य आणि विज्ञानाचे नियम यांच्या कसोट्यांवर घासून चमत्कारांचे विश्लेषण केले आणि त्यांमागील कार्यकारणभाव समाजासमोर ठेवला तर त्यामुळे अंधश्रद्धा नाहीशा होतील.

पूर्वीच्या काळी प्रवासाची साधनं फारशी सुखसोयींची नव्हती. रात्रीच्या मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचणं कठीण. दिवस मावळून गेलेला. अन् मुक्कामाचं ठिकाण तर खूप दूर राहिलेलं. धड नाहीत रस्ते. नाही प्रकाशाची सोय. प्रवासी शेताडं, माळरानं, अशा भागातनं प्रवास करीत. काही प्रवाश्यांना, संध्याकाळी, रात्री, दलदलीच्या जागी ज्योती पेटलेल्या दिसत. त्या ज्योतींना will-o-the-wisp असे म्हणत. अशा ज्योती पाहून काही प्रवासी मोहून जात. त्यांचा शोध घेण्यासाठी अंधारातही त्यांचा पाठलाग करीत. दलदलीत, चिखलात अडकून पडत, त्यातच त्यांचा



उपद्रवी जीव केवळ धोका दर्शविण्यासाठी उपद्रव देतात. ते शत्रू नव्हेत. उदय भवाळकर, पुणे ९.

अंत होई.

आपल्या देशात अनेक गावांमध्ये, विशेषत: खेडेगावांमध्ये, स्मशान, गावापासून दूर असते. स्मशानाच्या आजूबाजूला दलदलही भरपूर असते. दलदलीच्या ठिकाणी अनेक वेळा ज्योती पेटलेल्या दिसतात. शाळेतले शिक्षक, गावातले जाणकार, ज्ञानी माणसं यांनी त्या ज्योती पाहिलेल्या असतात. त्या ज्योती आपोआप कशा पेटतात, याची कारणं त्यांना समजलेली नसतात. त्यामुळे स्मशानामध्ये नाचणाऱ्या ह्या ज्योतींना पाहून, ''स्मशानात भुतं नाचतात', 'स्मशानात वेताळाची स्वारी येते. तो वेताळ ज्योती पेटवतो, दिवट्या-मशाली पेटवतो', अशा समजुती खेडोपाडी पसरतात. अनेक प्रामाणिक लोकांनी त्या पाहिलेल्या असतात. त्यामुळे अशा घटना घडणं शक्य नाही, किंवा त्या घटना खोट्या आहेत असा आरोपही त्यांच्यावर आपण करू शकत नाही.

खरं तर 'वेताळाच्या ज्योती' हा सृष्टी चमत्कार म्हणजे एखादी कपोलकल्पित परीकथा नव्हे! फ्रेडरिक विल्हेल्म बेसल (इ.स. १७८४ ते १८४६) हा प्रख्यात जर्मन खगोलशास्त्रज्ञ. त्याने वेताळाच्या ज्योती पाहून त्यांचं सुंदर वर्णन लिहून ठेवलं आहे.

श्री. मुल्ले व श्री. एर्झबाक ह्या दोन शास्त्रज्ञांनी ह्या चमत्काराची भरपूर माहिती इ.स. १८८७ मध्ये प्रसिद्ध केली. त्यावर भरपूर संशोधन करून, त्याचं वैज्ञानिक स्पष्टीकरण इ.स. १९०३ व इ.स. १९१६ मध्ये वैज्ञानिक मासिकात प्रसिद्ध केले.

पाश्चात्य देशात ह्या ज्योतींना 'विलो द विस्प', डेव्हिल्स कँडल्स', 'जॅक विथ लँटर्न', जॅक ऑफ द लँटर्न' 'इग्निस फेटस्' (मूर्खांचा अग्नी) अशी नावं आहेत. आपल्या देशाप्रमाणेच जगभर सगळीकडे ह्या ज्योती दिसणं 'अशुभ' आहे, अशी समजूत आहे.

बहुतेक वेळा हा चमत्कार पाणथळ किंवा दलदलीच्या ठिकाणी दिसतो. पीक कापून झालंय. उरलेला पाला-पाचोळा खाचरात सडत पडलाय, अशा खाचरात ह्या ज्योती दिसतात. नदी-नाले, ओढे-झरे, विहिरी ह्यांच्या काठ्या आजूबाजूच्या चिखलात किंवा त्यांच्या बंधाऱ्यांवर अशा ज्योती नाचताना दिसतात. नवीन पेरणी करताना अनेक वेळा शेतकरी शेतात खूप पाणी टाकून चिखल तयार करतात. मग तो चिखल पायाने तुडवतात. अशा पायमल्लींच्या वेळी शेतकऱ्यांना त्यांच्या पायाखाली, किंवा आजूबाजूच्या चिखलात अचानक पेट घेणाऱ्या ज्योती दिसतात. कधी कधी सोनखत तयार होत असलेल्या खाचरात अशा ज्योती दिसतात.

ह्या ज्योती लामण दिव्यामधल्या किंवा निरांजनामधल्या ज्योतींसारख्या दिसतात. त्यांची उंची १.५ सेंमी. ते १२ सेंमी. तर रुंदी १ सेंमी ते ५ सेंमी. इतकी असते. बहुतेक वेळा ह्या ज्योती जमिनीलगत तेवत असतात. पण कधीकधी अधांतरी, जमिनीपासून १०-



प्रायोजक : अभ्यंकर क्लासेस, सांगली. ☎ ७५९०३

१२ सें.मी. उंचीवर तेवत असलेल्या दिसतात. कधीकधी ह्या ज्योती चक्क पाण्यावर तेवत असतात. ह्या ज्योतींचा रंग बहुतेक वेळा पिवळा असतो. पण कधीकधी तांबडा, निळा असतो. ह्या ज्योतींवर बोट धरले तरी भाजत नाही. ज्योतींवर वाळलेल्या फांद्या, बोरू, लाकडी पेन्सिली धरल्या तरी जळत नाही. पण कागद, कापूस, कपडे मात्र ह्या ज्योतींमध्ये धरले तर ते जळतात. वेगवेगळ्या धातूंचे तुकडे ह्या ज्योतींमध्ये धरले तर ते तापत नाहीत.

ह्या ज्योती खरोखरच नाचतात का? नाही. ह्या ज्योती स्वत:हून नाचत नाहीत. मग 'मृतात्म्यांच्या ज्योती नाच करतात' असं वर्णन गावकरी करतात ते का? ह्या ज्योती उघड्यावर तेवत असतात. वाऱ्याची झुळूक आली की एखादी ज्योत विझते व तिच्या जवळच दुसरी ज्योत तेवू लागते. कधी कधी वाऱ्याचा जोर जरा जास्त असतो. त्यामुळे काही ज्योती फडफड करीत वाऱ्याबरोबर दूर वाहात जातात नी मग तिथे विझतात. कधी कधी ज्योत पेटण्यापूर्वी तेथे छोटासा स्फोट होतो नी मग ज्योत तेवू लागते. बऱ्याचवेळा ह्या ज्योती विझतात आणि थोड्यावेळानं पुन्हा पेटतात. ह्या ज्योती दोन-दोन तासांपासून संपूर्ण रात्रपर्यंत तेवत राहतात. कधीकधी ह्या ज्योतींमधून कुजलेल्या अंड्यासारखा, गंधकासारखा, कुजलेल्या पाचोळ्यासारखा घाण वास येतो. ह्या ज्योतींचा प्रकाश अतिशय मंद असतो. त्यामुळे त्या दिवसा किंवा प्रखर प्रकाशात दिसत नाही. पण फारच क्वचित् प्रसंगी दिवसादेखील ह्या ज्योती दिसल्याची वर्णनं वाचावयास मिळतात.

'वेताळाच्या ज्योती' हा चमत्कार जेथे सेंद्रिय पदार्थ कुजत असतात, जेथे चिखल, दलदल असते अशा ठिकाणी दिसतो. खरंतर ह्या वर्णनातच ह्या सृष्टीचमत्काराचं, अप्रत्यक्षपणे, वैज्ञानिक स्पष्टीकरण मिळतं.

कुजणारे सेंद्रिय पदार्थ, दलदल अशा ठिकाणी सल्फर डाय-ऑक्साईड, हायड्रोजन फॉस्फाइड, मिथेन, ब्युटेन अशा प्रकारचे ज्वालाग्राही वायू निर्माण होतात. त्यापैकी सल्फरडाय ऑक्साईड व हायड्रोजन फॉस्फाइड या वायूंचं मिश्रण कमी तापमानास आणि अचानक पेट घेतं. इतर ज्वालाग्राही वायू जळण्यासाठी उच्च तापमानाची आवश्यकता असते. त्यामुळे त्या वायूंपासून निर्माण होणाऱ्या ज्योती ह्या 'उष्ण-ज्योती' असतात. पण बाकीच्या वायूंच्या मिश्रणाच्या ज्योती ह्या 'शीत-ज्योती' असतात. म्हणून त्या ज्योतींवर हात धरला तर आपल्याला भाजत नाही. वायूंच्या मिश्रणात सल्फरडाय ऑक्साईचे प्रमाण जास्त असलं, तर त्या ज्योती पेटल्यावर कुजणाऱ्या अंड्यासारखा उग्र दर्प येतो. ह्या वायूंच्या मिश्रणापासून काही शास्त्रज्ञांनी 'वेताळाच्या ज्योती' हा सृष्टीचमत्कार प्रयोगशाळेमध्ये निर्माण करून दाखविला. ●●

**डॉ.हेमंत विंझे,** शिवाजी पार्क, मुंबई १६.



प्रायोजक : ॲडॅप्ट रेकॉर्डिंग इन्स्ट्रुमेंटस् प्रा. लि. पुणे.

कथा

# स्वप्नांची छायाचित्रे

***– द्वारकानाथ लेले***

मृणाल आज सकाळपासून अस्वस्थ होती. काल रात्री तिला पडलेलं स्वप्न पुन्हा पुन्हा आठवत होतं. स्वप्नात पाहिलेला तो डोंगराच्या सुळक्यावरचा राजवाडा. रंगीबेरंगी पोशाख घातलेले सैनिक, झुळूझुळू वाहणारे निळेशार झरे, त्याच्याकाठी खेळणारी गोऱ्या चेहऱ्यांची मुलं. सारं कसं प्रत्यक्ष पाहिल्यासारखं वाटत होतं. तिनं लहानपणी वाचलेल्या एका परिकथेत हे सारं वर्णन होतं. पण आता तेरा–चौदा वर्षांची झाल्यानंतर, नववीत आल्यावर त्या परिकथेचं स्वप्न तिला काल रात्री पडलं होतं आणि हे स्वप्नातील दृश्य कॅमेऱ्यात पकडता आलं तर किती मज्जा येईल या कल्पनेनं ती अस्वस्थ झाली होती. तिचं तिलाच एकदा वाटलं की काय वेडी आहे मी! अशी कुठं स्वप्नांची छायाचित्रे काढता येतात का? पण लगेच तिच्या मनानंच उत्तर दिलं की काय अशक्य आहे? चंद्रावर माणूस जाईल हे कधी खरं वाटलं होतं का? पण झालं ना खरं? मग स्वप्नांची छायाचित्रंसुद्धा निघायला काय हरकत आहे?

मृणाल ही डॉ. आगरकर यांची एकुलती एक मुलगी. मृणालची आईही मानसशास्त्राची प्राध्यापिका. घरात विविध विषयावरच्या पुस्तकांचं भांडार. मृणालच्या आई–बाबांनी मृणालला लहानपणापासूनच वाचायची गोडी लावली होती. त्यामुळे ती गोष्टींची पुस्तकं वाचायची शिवाय आई–बाबांकडे येणारी विविध विषयांवरची मासिकंही चाळायची. त्यामुळे तिची बुद्धी चौकस झाली होती.

मृणालचे बाबा तिला नेहमी म्हणायचे, ‘‘हे बघ मृणाल तू इंजिनियर, डॉक्टर व्हायला मला नको आहे. ते तर सारीच होतात. तू काहीतरी निराळं कर. संशोधक हो.’’ तिला त्यांनी अनेक प्रकारची खेळणी, उपकरणं आणून दिली होती. एका छोट्या खोलीत मृणालनं आपली छोटी प्रयोगशाळाच स्थापली होती. दिवसाचा बहुतेक वेळ ती तिथंच असायची. काहीतरी करत बसायची. तिला बाबांनी नुकताच एक कॅमेरा आणून दिला होता. तो स्वयंचलित होता. विशिष्ट वेळानंतर आपोआप छायाचित्रं निघण्याची सोय त्या कॅमेऱ्यात होती.

म्हणूनच आता मृणालच्या मनात येत होतं की या कॅमेऱ्यात स्वप्नांची छायाचित्रं निघायला काय हरकत आहे? पण तिच्यापुढे दोन प्रश्न होते. एक म्हणजे स्वप्नातील वस्तू या काल्पनिक असतात. प्रत्यक्षात नसतात. तेव्हा त्यांना कॅमेऱ्यात कसं पकडायचं? आणि दुसरा म्हणजे स्वप्न कधी पडणार हे माहीत नसल्यानं स्वप्नाची वेळ नेमकी कशी साधायची?

हा प्रयोग करण्याआधी स्वप्न कशी पडतात हे माहीत करून घेणं आवश्यक होतं. पण त्यासाठी बाहेर जाण्याची गरज नव्हती.कारण तिचीआईच मानसशास्त्राची प्राध्यापिका होती.



मोकाशी कुटुंबियांकडून हार्दिक शुभेच्छा!

संध्याकाळी आई महाविद्यालयातून आल्यावर मृणालनं हा प्रश्न आईकडे काढला.

''आई, स्वप्नं कशी पडतात गं?''

''आपण जे पाहतो, जे वाचतो, त्यापैकी जे मनावर ठसतं ते स्मरणात साठवलं जातं आणि कधीतरी ते पूर्ण किंवा काही प्रमाणात स्वप्नामध्ये प्रकट होतं.'' आई म्हणाली.

''पण आई, गोष्ट आज वाचतो आणि स्वप्नं पार दोन चार वर्षांनी पडतं हे कसं काय?''

''हीच तर गंमत आहे. एवढंच नव्हे तर जे वाचलं, पाह्यलं ते आणि जे वाचलं, पाह्यलंही नाही असे प्रसंग, व्यक्ती, वस्तू एकत्र येऊन कधीकधी निराळीच स्वप्न पडतात. पण काय गं मृणाल? आज स्वप्नांची एवढी चौकशी?''

''आई या स्वप्नांची छायाचित्र घेता आली तर काय गंमत होईल नाही?''

आई हसली आणि म्हणाली ''कल्पना चांगली आहे; पण प्रत्यक्षात कशी येणार? बघ प्रयत्न करून.''

आईनं मृणालला प्रोत्साहनच दिलं होतं. तिच्या एक गोष्ट लक्षात आली की स्वप्नांचा मेंदूशी संबंध आहे. मेंदूमध्येच चित्राच्या स्वरूपात ही स्वप्ने उमटत असणार आणि आपण अर्धवट झोपेत पाहात असणार. आता हा प्रयोग करण्यासाठी मेंदूच्या कार्यपद्धतीची अधिक माहिती मिळवायला हवी होती. त्यासाठी बाबांचं सहकार्य मिळवायला हवं होतं आणि काय आश्चर्य? तिनं बाबांपाशी हा विषय काढला मात्र आपल्या मुलीची चौकस बुद्धी पाहून त्यांनी तिला लागेल ते सहकार्य करण्याचं मान्य केलं. ते मृणालला घेऊन एका मेंदूतज्ज्ञ डॉक्टरांकडे गेले. त्यांनी मृणालला मेंदूची कार्यपद्धती समजावून दिली. विविध उपकरणांद्वारे त्याची नोंद कशी केली जाते हेही दाखवलं.

मृणालचा मार्ग आता बराच मोकळा झाला होता. मेंदूतील घडामोडींची नोंद कागदावर होऊ शकते तर कॅमेऱ्यात का होऊ नये? तिनं बाबांच्या मदतीनं मेंदूची नोंद ठेवणारी उपकरणं खरेदी केली. ती महागडी होती. पण लेकीच्या या आगळ्या हट्टापायी कितीही खर्च करायची डॉ. आगरकर यांची तयारी होती. सलग बारा तास चालणारा कॅमेरादेखील होता त्यात. ते मनाशी म्हणत ''हा मृणालच्या लग्नात द्यायचा हुंडा म्हणून.'' मेंदूत होणाऱ्या घडामोडींची नोंद करण्यासाठी तिनं कॅमेऱ्याचे बरेच फिल्म रोल आणले. रात्रभरची नोंद ठेवायची असल्यानं खूप फिल्म लागणार होती. कदाचित ती सर्व वायाही जाण्याची शक्यता होती पण त्याला इलाज नव्हता.

मृणालनं हा प्रयोग स्वत:वरच करायचं ठरवलं. रात्री झोपताना तिनं खरेदी केलेली उपकरणं वायरच्या साहाय्यानं डोक्याशी जोडली. त्याला एका वायरनं कॅमेराही जोडून ठेवला. स्वप्नं कधी पडणार हे माहीत नसल्यानं तिनं सर्व रात्रभर कॅमेरा चालूच



A.V. BHAT HOUSING COMPANY, 1348, Sadashiv Peth, Pune 30.

ठेवण्याचं ठरवलं. डोक्याला जोडलेल्या वायर्समुळे तिला त्या रात्री लवकर झोप आली नाही; पण उशीरा झोप लागली. सकाळी उठताच तिनं कॅमेऱ्यातली फिल्म धुतली.... पण त्याच्यावर काही रेघांव्यतिरिक्त काहीच नोंद नव्हती. बरोबर आहे. कारण त्या रात्री मृणालला स्वप्नच पडलं नव्हतं.

अशा तीन रात्री गेल्या. भरपूर फिल्म वाया गेली. आपला प्रयोग फसणार असं मृणालला वाटायला लागलं. आणखी दोन रात्री हा प्रयोग करायचा आणि सोडून द्यायचा असंच तिनं ठरवलं.

चौथ्या रात्री मात्र निराळंच घडलं. तिला स्वप्न पडलं. ते त्यांनी बाळगलेल्या स्नोबॉल या कुत्र्याचं. मृणाल लहान असताना त्यांनी एक कुत्रा बाळगला होता. डॉ. आगरकरांनी मृणालसाठी तो मुद्दाम आणला होता. कापसाच्या किंवा बर्फाच्या गोळ्याप्रमाणे तो पांढराशुभ्र व गुबगुबीत गोल होता. मृणालला तो फार आवडायचा. एकदा डॉ. आगरकर सहकुटुंब सहलीसाठी समुद्रावर गेलं होतं. पण कसा कोण जाणे स्नोबॉल समुद्रात शिरला तो परत आलाच नाही. मृणालनं रडून आकांत केला. घर डोक्यावर घेतलं. पण काही दिवसांनी मृणाल हे दु:ख विसरली.

याच स्नोबॉलचं स्वप्नं त्या रात्री मृणालला पडलं. मृणाल व तिचे आई-बाबा समुद्रकाठी बसले आहेत. अचानक स्नोबॉल पाण्यात शिरला आणि एका लाटेसरशी वाहून गेला. तो बाहेर आलाच नाही. त्याला पकडण्यासाठी मृणाल पुढं धावली पण आईबाबांनी तिला आवरलं.

हेच स्वप्नं तिला पडलं होतं. 'स्नोबॉल' असं ओरडतच ती जागी झाली आणि तिच्या लक्षात आलं की डोक्याला वायर्स आणि कॅमेरा जोडला आहे. स्नोबॉलच्या आठवणीचं दु:ख आणि स्वप्न पडलं याचा आनंद ती एकाच वेळी अनुभवत होती. ती पटकन उठली. तिनं वायर्स काढल्या. कॅमेऱ्यातून फिल्म काढून धुतली आणि तिला आश्चर्याचा सुखद धक्का बसला.

फिल्मवर अस्पष्टपणे का होईना समुद्राच्या लाटा दिसत होत्या, समुद्रात शिरणारा स्नोबॉल, त्याला पकडायला धावणारी मृणाल, तिला आवरणारे आईबाबा अस्पष्ट रेघांच्या स्वरूपात दिसत होते. मृणाल आनंदानं धावतच घरात गेली.

"आई, बाबा माझा प्रयोग यशस्वी झाला. मी स्वप्नाचं छायाचित्रं काढलं. हे बघा."

मृणालची फिल्म पाहून आई-बाबा खूष झाले. त्यांनी तिची पाठ थोपटली. शोध यशस्वी झाला. बाबांनी त्याला "मृणालड्रीम्स्" नाव दिले याचा मृणालला हर्ष झाला. हर्षातिशयाने ती हसत सुटली-हसतच राहिली. भ्रमिष्ट झाली.

स्वप्नांची छायाचित्रं घेण्याचा शोध लावण्याचा आजवर पुन: कुणी प्रयत्न केला नाही.

●●

**द्वारकानाथ लेले**
क्षिप्रा, पत्रकारनगर, पुणे ५३.



MICROVERSE AUTOMATION (P.) LTD. for Automation, Requirements of process plant

# हे ऋषिवर श्री अरविंद

**– विश्वनाथ गुर्जर**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक थोर क्रांतिकारक. इंग्रजी भाषेवर असामान्य प्रभुत्व असणारे एक प्रतिभासंपन्न भारतीय कवी आणि लेखक, ईश्वरी अस्तित्वाचा साक्षात् अनुभव घेतलेले एक महायोगी, मानवजातीला तिच्या दु:खांपासून आणि अपूर्णतांपासून मुक्त करून पृथ्वीचा स्वर्ग आणि मानवाचा देवमानव करण्याचे स्वप्न पाहणारे एक भविष्यदर्शी द्रष्टे अशा विविध रूपांमध्ये विश्वविख्यात असणाऱ्या श्री अरविंदांचा ५ डिसेंबर १९५० हा महानिर्वाणदिन. त्या निमित्ताने त्यांचे हे पुण्यस्मरण.

महात्मा गांधी, लोकमान्य टिळक या राष्ट्रपुरुषांएवढे श्रीअरविंदांचे नाव प्रसिद्ध नाही हे जरी मान्य केले तरी हे दोन्ही राष्ट्रपुरुष श्रीअरविंदां- विषयी अत्यंत आदर बाळगणारे होते. श्रीअरविंद हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात 'वंगभंग आंदोलन' या नावाने प्रसिद्ध असणाऱ्या संघर्षात बंगालमधील तरुणांचे स्फूर्तिदाते होते. लो. टिळकांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. त्या निमित्ताने बंगाल आणि महाराष्ट्र या दोन प्रांतातील अनेक देशभक्तांचा संबंध आला होता. भारतात अशाप्रकारे एक राष्ट्रीयत्त्वाची भावना जागृत करण्यात म.गांधींच्या आधी श्री. अरविंद यांचे योगदान फार महत्त्वाचे आहे.

**'वेड एक होते तुम्हा,**
**मातृभूमिच्या मुक्तिचे**
**उग्र खड्ग झाला तुम्ही**
**जागृत भारतशक्तीचे'**

असे श्रीअरविंदांविषयी जे म्हटले आहे ते पूर्णपणे खरे आहे.



१५ ऑगस्ट १८७२ रोजी बंगालमध्ये श्री अरविंदांचा जन्म झाला.त्यांचे वडील डॉ.कृष्णधन घोष हे भारताविषयी मनात खूप प्रेम असूनही पाश्चात्य विचारांचा प्रभाव असणारे होते. त्यामुळे त्यांनी त्यांच्या तीन मुलांना लहानपणीच शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले. १८७९ ते ८४ अशी पाच वर्षे श्रीअरविंद आणि त्यांचे दोन भाऊ इंग्लंडमध्ये डॉ. कृष्णधन घोषांचे



प्रायोजक : बजेट कन्स्ट्रक्शन्स, १०२, 'वीरशांती'. क्रांती चौक, औरंगाबाद.



मित्र असणाऱ्या रेव्हरंड ड्रेवेट यांच्या घरी राहिले. त्यानंतर मात्र रेव्हरंड ड्रेवेट ऑस्ट्रेलियाला गेल्यावर त्यांच्या आईने या तीन मुलांना वाऱ्यावर सोडून दिले. डॉ. कृष्णधन घोष प्रारंभीती तीन चार वर्षे इंग्लंडला नियमितपणे पैसे पाठवित होते. पण नंतर त्यांची परिस्थिती खालावल्यामुळे त्यांच्याकडून पैसे येणे बंद झाले आणि इंग्लंमध्ये या तिघांची अवस्था खूपच हलाखीची झाली. तशाही परिस्थितीत या तिघांनी स्वाभिमान आणि उमेद न सोडता नोकरी अथवा शिष्यवृत्ती अशा मार्गांनी पैसे मिळवून आपले शिक्षण चालू ठेवले. १८९० साली श्रीअरविंद आय.सी.एसची लेखी परीक्षा (सध्याची आय.ए.एस.ची परीक्षा) उत्तीर्ण झाले. ग्रीक आणि लॅटीन या विषयांमध्ये त्यांनी उच्चांक प्रस्थापित केला. उमेदवार अधिकाऱ्यांच्या यादीत त्यांचे नाव झळकू लागले. सरकारकडून निर्वाहवेतन मिळू लागले. एक दुसरीही शिष्यवृत्ती मिळू लागली. त्यामुळे त्यांच्या मनावरचा भार आणि आर्थिक ताण कमी झाला. १८९० ते ९२ या दोन वर्षांच्या काळात अरविंदांनी त्यांच्या आवडीच्या अनेक छंदांची जोपासना केली. मित्र जोडले. खूप अभ्यास केला. अनेक वादसभा गाजविल्या. इंग्लंडमधील भारतीयांच्या दोन गुप्त संघटनांशी त्यांचा संबंध आला. या सगळ्या घडामोडींमधून त्यांचे विचार आकार घेऊ लागले आणि त्यांनी भारतात जाऊन इंग्रज सरकारच्या प्रशासकीय सेवेत पडण्याऐवजी देश स्वतंत्र करण्यासाठी जीवन समर्पित करण्याचा निश्चय केला. त्यामुळे आय.सी.एस.ची लेखी परीक्षा उत्तीर्ण होऊनही अश्वारोहणाच्या परीक्षेला न बसून श्री अरविंदांनी आय.सी.एस. च्या पदवीकड पाठ फिरविली.

इ.स. १८९३ या वर्षी अरविंद भारतात परत आले. योगायोगाची गोष्ट म्हणजे याच वर्षी स्वामी विवेकानंद भारतातून अमेरिकेत गेले. पूर्व आणि पश्चिम या दोन संस्कृतींना सांधणारा सेतू बांधून नवमानवता धर्माची आणि देवमानावाच्या जन्माची मुहूर्तमेढ रोवणारे हे दोघेही वंगभूमीचे म्हणजे बंगालचे सुपुत्र! श्रीअरविंदांनी भारतात परत आल्यावर बडोद्याला श्री सयाजीराव गायकवाड यांच्या संस्थानात नोकरीस प्रारंभ केला; पण त्यांचे मन केवळ नोकरी करीत बसण्यात रमणारे नव्हते. पहिली काही



व्हिडिओकॉन व्हि.सी.आर.लि. तर्फे प्रबोधकांना शुभेच्छा!

वर्षे त्यांनी भारताच्या संस्कृतीचा आणि तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात खर्च केली. भारतीय भाषांचे अध्ययन चालू ठेवले आणि १९०५ मध्ये बंगालच्या फाळणीच्या निमित्ताने राजकीय रणांगणामध्ये उडी मारून क्रांतिकार्यास प्रत्यक्ष प्रारंभ केला. इंग्रजांचे शासन उलथून टाकण्यासाठी तयार असणाऱ्या सशस्त्र तरुणांची संघटना निर्माण करणे आणि अशा तरुणांच्या मागे उभे राहील असे समाजमन घडविणे या प्रकारचे काम करण्यासाठी त्यांनी एकीकडे तरुणांना शस्त्रविद्या शिकविता येईल अशी व्यवस्था केली तर दुसरीकडे वृत्तपत्रांतून लोकजागृतीचे काम केले.

ब्रिटिशांशी संघर्ष करून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्न करायचे की ब्रिटिशांच्याच राज्यात केवळ थोड्या सुधारणा व्हाव्यात म्हणून ''मायबाप सरकारला अर्ज विनंत्या करायच्या'' हा त्यावेळी एक वादाचा प्रश्न होता. त्यावेळी ब्रिटिशांविषयीचे सर्व भ्रम दूर ठेवून त्यांच्याशी संघर्ष करण्याचे आवाहन श्रीअरविंदांनी युवकांना केले होते.

या सर्व कामात लो. टिळक, भगिनी निवेदिता यांसारख्या तेजस्वी व्यक्तीशी त्यांचा निकटचा परिचय आला. पुढे श्रीअरविंद बडोद्यातील नोकरी सोडून बंगालमध्ये जाऊन राहिले.

क्रांतिकार्याच्या व लोकजागृतीच्या खटाटोपात ते मग्न असताना सरकारने त्यांना एका बॉबस्फोटाच्या खटल्यात गुंतवून अलिपूर येथील तुरुंगात डांबले.



त्या तुरुंगात ते एक वर्षभर होते. (इ.स. १९०८) त्या काळात त्यांनी तीव्र योगसाधना केली. तेथे त्यांना ईश्वरी अस्तित्वाचा साक्षात् अनुभव आला. पुढे बॅरिस्टर चित्तरंजन दास यांच्या वकिली कौशल्याने श्रीअरविंद यांची तुरुंगातून मुक्तता झाली.

पुढे ते ईश्वरी प्रेरणेने पाँडिचेरी (मद्रासच्या दक्षिणेला) येथे गेले. आयुष्याच्या अखेरीपर्यंत ते तेथेच होते. पाँडिचेरीला श्री अरविंद हे एका अगदी वेगळ्या प्रकारच्या योगसाधनेत मग्न होते. मानव-जातीला तिच्या अपूर्णतांपासून आणि दु:खांपासून मुक्त करावयाचे असेल तर मानवी मन आणि बुद्धी यांच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ पातळीवरील मन आणि बुद्धी असणाऱ्या मानवांचा संघ (देवमानवसंघ) निर्माण व्हावयाला हवा. तो निर्माण होण्यासाठी काय प्रकारे प्रयत्न केले



'गीअर टेक्नॉलॉजी' तर्फे छात्र प्रबोधनला शुभेच्छा!

पाहिजेत, कशी साधना केली पाहिजे ह्याची मांडणी श्रीअरविंदांनी अनेक ग्रंथांमधून केली. त्यांनी मांडलेल्या ध्येयाने आकृष्ट होऊन त्यांच्याकडे शिष्य म्हणून आलेल्यांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांनी तेथे एक आश्रम विकसित केला. आज या आश्रमात सुमारे ३००० लोक या ध्येयाने प्रेरित होऊन प्रयत्न करीत आहेत. आश्रमात नसलेल्या व्यक्तींनासुद्धा अरविंदांनी सांगितलेल्या पूर्णयोगाची साधना करून अतिमानसशक्तिचे अवतरण घडविण्यात आणि देवमानव संघाची निर्मिती करण्यात सहभागी होता येईल.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा अरविंदांचा संदेश 'मद्रास'च्या आकाशवाणीवरून प्रसारित झाला होता. त्यात त्यांनी त्यांच्या पाच स्वप्नांविषयी सांगितले होते. ती पाच स्वप्नं थोडक्यात अशी होती की –

१. भारत हे स्वतंत्र, अखंड आणि एकात्म स्वरूपात राष्ट्र म्हणून उभे राहावे.

२. आशिया खंडातील जनता जागृत होऊन मानवी संस्कृतीच्या विकासात आशिया खंडाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी.

३. संपूर्ण मानवसमाज एकात्म होण्यासाठी अनेक क्षेत्रांमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय संस्था, संघटना निर्माण व्हाव्यात तसेच संरक्षण आणि युद्धसामग्रीवरील सध्याचा अवाढव्य खर्च कमी होण्यासाठी सर्व राष्ट्रांचा विश्वास असणारी एक जागतिक संघटना निर्माण व्हावी.

४. हिंदुस्थानातील आध्यात्मिक विचारांचा प्रसार जगात सर्वत्र व्हावा.

५. मानवी मन आणि बुद्धि यांच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ प्रकारची जाणीव-शक्ती असणारा देवमानव संघ तयार होऊन उत्क्रांतीचा पुढील टप्पा गाठला जावा.

भारताच्या स्वातंत्र्याप्रमाणेच या पाचही स्वप्नांचं वेड त्यांना आणि त्यांच्याबरोबर आध्यात्मिक व व्यावहारिक क्षेत्रात काम करणाऱ्या त्यांच्या सहकारिणी श्रीमाताजी या दोघांना लागले होते.

श्रीमाताजींनी भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनाला त्यांचे जे हृद्गत प्रकट केले त्यात त्यांनीही श्रीअरविंदांप्रमाणेच आकांक्षा व्यक्त केली आहे. त्या म्हणतात –

"हे भारतमाते, तुझ्या स्वातंत्र्याची उषा उदित झाली असताना, तुला आम्ही कोटि कोटि प्रणाम करतो. तू आमची मार्गदर्शिका हो. आम्हाला असा मार्ग दाखव की उत्तुंग ध्येयाच्या दिशेने आमची वाटचाल होत राहील आणि जगातील सर्व मानवांशी मित्रत्वाचे नाते ठेवूनही त्यांना अध्यात्मविद्येतील मार्गदर्शन करण्याचे कार्य करणारे राष्ट्र असे भारताचे स्थान जगात निर्माण होईल."

श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांनी पाहिलेली स्वप्ने साकार होण्याच्या दिशेने अनेक घटना जगात घडत आहेत. तथापि विरोधी स्वरूपाच्या घटनाही घडत आहेत. त्यामुळे ज्यांना (विशेषत: तरुण-तरुणींना – कारण भविष्यकाळ त्यांचाच आहे.) श्री अरविंद-माताजी यांच्या आकांक्षेप्रमाणे भविष्यकालीन जग घडावे असे वाटत असेल तर त्यांनी काय केले पाहिजे हा विचार सर्वात महत्त्वाचा आहे.

श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचं



*Best Compliments From* LAXMI SWEETS



**श्रीमाताजी**



**श्रीअरविंद**

यासंबंधी असं म्हणणं की तरुण-तरुणींनी व्यक्तिश: स्वत: केवळ ''भरपूर पैसे मिळविणे'' या ध्येयापेक्षा अधिक श्रेष्ठ ध्येय स्वत:समोर ठेवायला हवे. त्या ध्येयासाठी कळकळीने, मन:पूर्वक, खूप परिश्रम करण्याची तयारी ठेवली पाहिजे. असे परिश्रम करता यावेत यासाठी शारीरिक व मानसिक दृष्टचा उत्तम आरोग्य राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यादृष्टीने खाणे, पिणे, झोप, व्यायाम इ. सर्व आहारविहारंमध्ये संयम राखला पाहिजे. विज्ञानाच्या अध्ययनातून शास्त्रीय बुद्धी तसेच कलांच्या अध्ययनातून सौंदर्यदृष्टी आणि सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनातून नैतिक दृष्टी यांचा विकास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ईश्वरावर अथवा सत्यावर अथवा विकासावर श्रद्धा ठेवून उत्कटपणे, सातत्याने आणि धैर्य न सोडता प्रयत्न केले पाहिजेत.

हे सर्व एकत्रपणे करणे म्हणजेच योग दृष्टीने जीवन व्यतीत करणे - योगसाधना करणे. श्रीअरविंद आणि श्रीमाताजी या दोघांनी मिळून असे पूर्णयोगाचे तत्त्वज्ञान मांडले आहे. हे तत्त्वज्ञान त्यांनी घेतलेल्या आध्यात्मिक अनुभवांमधून आलेले आहे. या आध्यात्मिक अनुभवातील सर्वश्रेष्ठ अनुभव म्हणजे संपूर्ण विश्वाचे संचालन करणारी जी जगच्चालक शक्ती आहे तिच्याशी सर्व पातळ्यांवर आपले मीलन होणे आणि त्या शक्तीच्या इच्छेने आपले सर्व व्यवहार आपण करीत असल्याचे भान आपल्याला होणे. असा अनुभव प्राप्त झालेल्या व्यक्तींचा संघ म्हणजे देवमानव संघ.

छात्रप्रबोधनचे विद्यार्थी आणि अन्य सदस्य अशा देवमानवसंघाचे सदस्य होण्यासाठी मार्गक्रमण करू इच्छितात काय? अशी इच्छा आणि प्रयत्न करणे हेच श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे पुण्यस्मरण आणि हीच त्यांना श्रद्धांजली.

●●

**विश्वनाथ गुर्जर**
मेहेंदळे गॅरेजच्या मागे,
एरंडवणे, पुणे ४.



महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कॉम्प्युटर्सतर्फे छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा!

## 'छात्र प्रबोधन' दीपावली विशेषांक मिळाला का?

महाराष्ट्र-गोवा-बेळगाव मिळून खालील ७२ ठिकाणी दीपावली विशेषांकासाठी वितरण व्यवस्था केली होती. वर्ष ५ अंक ३ मध्ये यासंदर्भात तपशीलामध्ये सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे अनेक सभासद दीपवाली विशेषांक घेऊन गेले असतील. तथापि अजूनही काही सभासद दीपावली विशेषांकाबद्दल चौकशी करत असल्यामुळे मुद्दाम या अंकामध्ये पुन्हा एकदा सर्व वितरण केंद्रांची यादी दिली आहे. ज्यांनी अजून **आपला दिवाळी अंक नेला नसेल त्यांनी हा अंक दाखवून संबंधित केंद्रावरून आपला दिवाळी अंक ३१ डिसेंबरपूर्वी घेऊन जावा.** त्यानंतर दिवाळी **अंक मिळणार नाही.** या केंद्राव्यतिरिक्त अन्य गावांमध्ये अंक पोस्टाने पाठविला असून ज्यांना अंक मिळाला नसेल त्यांनी पोस्टात चौकशी करावी. त्यांना अंक न मिळाल्यास नवीन अंक पाठविला जाणार नाही. त्यांनी दिवाळी अंक न मिळाल्याबद्दल कृपया पत्रव्यवहार करू नये. वितरणव्यवस्थेबाबत सहकार्य केल्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद!

## छात्र प्रबोधन पाठपुरावा प्रश्नावली

दीपावली विशेषांक केंद्रावरून घेऊन जाताना एक प्रश्नावली आपल्याला मिळाली असेल. काहींनी ती लगेचच भरून दिली असेल. पण ज्यांनी ती लगेच भरून दिलेली नाही त्यांनी ती भरून लवकरात लवकर वितरण केंद्रावर अथवा मुख्य कार्यालयात जमा करावी.

**खालील वितरण केंद्रांवर मासिकाची वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल. जास्तीचा दिवाळी अंक हवा असल्यास विकत मिळेल. (किंमत रु. ३०/-). पुस्तके ध्वनिफितींची मागणी नोंदविता येईल. * अशी खूण केलेल्या ठिकाणी पुस्तके-ध्वनिफिती विक्रीसाठी उपलब्ध आहेत.**

### छात्र प्रबोधनची वितरण केंद्रे

### १. मुंबई विभाग

**ठाणे** * – १) डॉ. अजित दातात, बी २० अहिल्या सोसा. घंटाळी रस्ता, ठाणे (प.) ☎ ५४२१०८७
२) सौ. अनघा पेटकर, १०, देवदत्त, भास्कर कॉलनी, नौपाडा, ठाणे ☎ ५४२४७२६
३) सौ. साधना भिंगारे, C-3, विश्वजीत सोसा. सावरकर मार्ग, तीन पेट्रोल पंपाजवळ ☎ ५४१६५४३

**डोंबिवली** * – सौ. ज्योती औटी, ३-श्री बिल्डींग, टिळकनगर हायस्कूल जवळ, डोंबिवली (पू.) ☎ ४७४१३९

**कल्याण** – श्री. प्रभाकर गायधनी, ४ जोशी सदन सोसा., टिळक चौक, कल्याण ☎ ४१०२७९

**मुलुंड** * – श्री. त्रिंबक ग. जोशी, एफ १७, शिवदर्शन सोसा., सेंट पायस हायस्कूलसमोर, पं. मदन मोहन मालवीय रस्ता, मुलुंड (प.) ☎ ५६९२२६०

**पार्ले** * – सौ. शुभदा देशपांडे, इ/३ नवप्रभात हौ. सोसा. हनुमान रस्ता, विलेपार्ले. ☎ ६१००८९६

**बोरीवली** – सौ. अंजली नलावडे, ६/२३५ योगानंद सोसा. वजिरा नाका, बोरीवली (प.) ☎ ८०८५५५०

### २. कोकण-गोवा-बेळगाव विभाग

**पनवेल** * – श्री. मकरंद कुलकर्णी, अ/६ गीतांजली सोसा. लोखंडीपाडा, पनवेल. ☎ ७४५४५०७

**पेण** – श्रीमती अनुराधा प्रकाश जोशी, अच्युतराव टिळक वाडा, हनुमान आळी, पेण, ☎ ३३६४



हाती घ्याल ते तडीस न्या- ध्वजत कुलकर्णी

**रोहा** – सौ. हेमलता कर्णिक, पवन १२ मंगलवाडी, सी.डी. देशमुख कन्या हायस्कूलशेजारी ☎ ४२८४३
**खोपोली** – डॉ. प्रमोदिनी परांजपे, परांजपे नर्सिंग होम, मोगलवाडी रस्ता. ☎ ६२५५०
**कर्जत** – सौ. कल्पना श्रीपाद कुलकर्णी, अ/२, गायत्री अपार्टमेंट, नाना मास्तर नगर. ☎ २३०१३
**महाड** – श्री. ग. गो. गाडगीळ (सर) १७५७, काकरतळे
**अलिबाग*** – श्री. तुषार साखळकर, 'सहयोग' श्रीबाग नं. २, अलिबाग.
**रत्नागिरी*** – सौ. अंजली कार्लेकर, लक्ष्मीबाई लिमये चाळ, जोशी पाळंद. ☎ २०७२४
**दापोली*** – श्री. विष्णू सोमण, द्वारा महाजन ब्रेव्हरेज, स्टेट बँक गल्ली, पेट्रोल पंपाजवळ. ☎ ८२८०२
**चिपळूण** – श्री. कानडे, उपमुख्याध्यापक, युनायटेड इंग्लिश स्कूल. ☎ ५२८७७
**गोवा** * – १) श्री. सुहास मुळे. A1/T2 इंदीरा अपार्ट. कोम्ब, मडगाव ☎ ७३६३२८
२) श्रीमती पुर्णिमा सुखटणकर, साईधाम, ४७, डिफेन्स कॉलनी, आल्ट परवरी. ☎ २१७३१२.
३) श्री. प्रमोद गणपुले, मुक्काम भटवाडी, पोस्ट कोरगाव, पेडणे
**बेळगाव** – चि. संकल्प विनायक कुलकर्णी, ४२ सराफ कॉलनी, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव

## ३. पश्चिम व दक्षिण महाराष्ट्र

**सातारा** * – १) श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१ सर्व्हे नं.३२०/१अ अंजली कॉलनी, करंजे तर्फ. ☎ ५०५०४
– २) 'रिलेशन्स' द्वारा श्री. प्रकाश देवकुळे, दुर्गा पेठ, आनंदवाडी दत्ताजवळ.
**वाई** – विज्ञान वाचनालय, द्वारा श्री. नागेश शंकर मोने, 'भाग्योदय', ११२३ ब्राह्मणशाही. ☎ ७०७६६
**कराड** – श्री. जयंत क्षीरसागर, ३१ विद्यानगर, 'सौख्यदा' क्षीरसागर क्लासेस, फार्मसी कॉलेजजवळ. ☎ ७१२२६
**सांगली** * – १) श्री. शैलेंद्र केळकर, ६९२ गावभाग, खाडिलकर गल्ली. ☎ ७७३८२
२) श्री. शंतनु गोरक्षनाथ इनामदार, व्ही ११, वंदन अपार्टमेंट, चिनार हॉटेलजवळ, नेमिनाथनगर, विश्रामबाग, ☎ ३२४२०४
**मिरज** – श्री. प्रभाकर पोंक्षे, अक्षय प्रोव्हिजन स्टोअर्स, लोकमान्य सोसायटी, मिरज कॉलेजजवळ ☎ २२३६७२
**जत** – सौ. आसावरी विकास भिसे, राम मंदीराजवळ, राघवेंद्र निवास, जत. ☎ ४६०३३
**विटा*** – सौ. सुनिता तु. देशचौगुले, 'आशीर्वाद' हॉस्पिटल, विटा. ☎ ७२००८
**इचलकरंजी** * – श्री. विनायक गद्रे, वॉर्ड नं. ५, घर नं. ६८अ, झेंडा चौक, इचलकरंची ☎ ४२४००८
**कोल्हापूर** * – १) डॉ. शुभांगी कुलकर्णी, आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ ☎ ५२१५३४
२) सौ. रेखा शहा, १६ सम्राटनगर, कृष्णाई बंगल्याशेजारी ☎ ६५९८९७
**सोलापूर** * – ज्ञान प्रबोधिनी, बालविकास मंदिर, डफरिन चौक, सोलापूर. ☎ २५७८२
**बार्शी** – श्री. रा.भ. गौरकर, अध्यापक कॉलनी, बार्शी ☎ २२५०१

## ४. उत्तर महाराष्ट्र

**नाशिक** * – १) सौ. साधना गाडगीळ, रामकृष्ण धाम, श्रीरामवाडी, म. गांधी रस्ता. ☎ ५७४८३०
२) कु. कविता रमण सागोरे, ५ कृष्णपिंगाक्ष सोसा. रचना विद्यालय रोड, शरणपूर ☎ ५८१९५१
३) सौ. पुष्पा गवांदे, 'सायंतारा', गणेश सोसा. शिखरेवाडी, नाशिक रोड.
**धुळे** * – सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरूड बाग, धुळे
**दोंडाईचा** – डॉ. अनिल सोहोनी, 'रचना' १८ प्रोफेसर्स कॉलनी, दोंडाईचा ☎ ४४३०९
**नंदूरबार** – श्री. विलास पांडुरंग जोशी, जनक आभूषण समोर, श्रीकृष्ण बिल्डिंग, ३रा मजला
**चाळीसगाव*** – श्री. विंचुरकर, मुख्याध्यापक, तात्या सामंत माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव
**चोपडा** * – श्री. सुधाकर केंगे, विवेकानंद विद्यालय, यावल रोड, चोपडा. ☎ २०५२८

## ५. मराठवाडा विभाग

**औरंगाबाद** ⁕ – १) सौ. स्वाती पळसकर, सनी कॉर्नर, दुसरा मजला, पैठण गेट. ☎ २३३२६
२) सौ. आश्विनी देशमुख, N-5, सुशील, प्लॉट न. १४४. सावरकर नगर, सिडको. ☎ ४८४६३२

**लातूर** ⁕ – डॉ. अरुण देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर. ☎ ४२६१४

**परभणी** ⁕ – श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर, परभणी

**सेलू** – मा. मुख्याध्यापक, नूतन विद्यामंदिर, सेलू

**नांदेड** ⁕ – श्री. मल्हार वि. लाठकर, रमा कॉम्प्युटर्स, ३० गोदावरी कॉम्प्लेक्स, व्ही.आय.पी.रोड ☎ ३३४६६५

**माजलगाव** – चि. श्रीपाद उदयराव कुलकर्णी, द्वारा – सानेगुरुजी बाल वाचनालय, उपाध्ये गुरुजींचा वाडा. सन्मित्र कॉलनी.

**आंबाजोगाई** – श्री. भि.म. आंबेगावकर, २५ श्रीनगर वसाहत, मांडवा रोड, आंबाजोगाई.

**परळी वैजनाथ** – श्री. एस.पी. तिळकरी, सहशिक्षक विद्यावर्धिनी विद्यालय, उर्जानगर, थर्मल कॉलनी.

**उस्मानाबाद** ⁕ – श्री. शेषाद्री व्यंकटेश डांगे, २७/५५८ 'स्नेहसंपदा' समतानगर, धाराशिव. २७५०

## ६. विदर्भ

**अमरावती** – श्री. अविनाश देशपांडे, 'श्रीरामकृपा' जोशींचे घर, मालटेकडीच्या मागे, श्यामनगर.

**अकोला** ⁕ – श्री. भूषण बापट, द्वारा – मिहीर उद्योग केंद्र, केशव अर्चना, गांधी चौक, अकोला

**नागपूर** – चि. देवदत्त मोहन लपालकर, १२२, 'विश्वास', नवी रामदास पेठ, नंदाजीबाबा देवळाजवळ ☎ ५४५१६७

## ७. पुणे व नगर विभाग

**अहमदनगर** – पद्माकर जाखडी, ३२ नरहरीनगर, गुलमोहोर रस्ता, हॉटेल सायंतारा समोर, ☎ २३६४८

**सासवड** – कु. अनघा वाघ, ५०४ क. सोपाननगर, हडको, सासवड

**बारामती** – चि. निलेश महाजन, २ सिल्व्हर अपार्टमेंट विजयनगर, भिगवणरस्ता, एम.इ.एस. हायस्कूल शेजारी, ☎ २३४६०

**नारायणगाव** – श्री. ल. गो. करंदीकर, शिक्षक वसाहत, गु.रा.प. सबनीस विद्यामंदीर.

## ८. पुणे शहर विभाग

**मध्य पुणे** ⁕ – छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, ☎ ४७७६९१

**मेहेंदळे गॅरेज** – श्री. वसंत साने, देवेश सहकारी गृह. संस्था. स.नं. ३४/३ एरंडवणा, ☎ ३४४५८०

**पौड रोड** – चि. प्रतीक हांडे, बिल्डिंग नं.१३ फ्लॅट नं. ८ आनंदनगर, पौड रस्ता. ☎ ३६९७७७

**कोथरुड** – डॉ. बोरकर, लेन नं. ५ प्राची अपार्टमेंट, ब्लॉक नं. १२, डहाणूकर कॉलनी. ☎ ३४१८५०

**मॉडेल कॉलनी** – श्री.रा.दि. बारटक्के, १०८७ अब/२ब 'शुभयोग', हरेकृष्ण मंदिर पथ, मॉडेल कॉलनी ☎ ३५६१०९

**पानमळा** – सौ. दीपा दिलीप ताटके. 'साकेत' A/६६ शिवप्रसाद हौ. सोसा. पानमळा. ☎ ४३४८४७

**माणिकबाग** – श्री. राजेंद्र विनायक कारंडे, सी १६ आशीर्वाद हौ. सोसा. सावरकर नगर, माणिकबाग

**पद्मावती** – चि. योगेश पाटणकर, B ६-११, गुरुराज सोसा. पद्मावती, पुणे सातारा रस्ता. ☎ ४२३९७३

**हडपसर** – कु. निलिमा चौधरी, बंटर स्कूल, टिचर्स क्वार्टर्स, गाडीतळ, हडपसर

**पिंपरी** – सौ. वृषाली करंदीकर, 'कर्मयोग' बि.नं.बी/२, ब्लॉक नं. ३०४, डॉ. बेक कंपनीसमोर.

**निगडी** ⁕ – १) ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी ☎ ८४३८०
२) सौ. संपदा राजन आगाशे, फ्लॅट नं.८, साने चेंबर्स, टिळक चौक, निगडी

**भोसरी** – श्री. श्रीकांत त्र्यंबक भाटे, प्रभुकृपा, चक्रपाणी वसाहत, भोसरी. ☎ ७९३१४९

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून राष्ट्रीय सौर १६ मार्गशीर्ष, शके १९१८, ७ डिसेंबर १९९६ या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, पुणे येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले आहे.



*Best Compliments From* CHAMUNDI ORGANICS (P.) LTD.

छात्र प्रबोधन निव्वळ मासिक नव्हे...... कृतिशील उपक्रमांचा स्रोत

# छात्र प्रबोधनच्या नावीन्यपूर्ण स्पर्धांमध्ये सहभागी व्हा!

**स्पर्धा क्र. १.** ***तुम्हीच संपादक व्हा!***
१६ पानी हस्तलिखित तयार करा.

**स्पर्धा क्र. २.** ***पंख सुरांचे ध्वनिफीत स्पर्धा***
३० मिनिटांची ध्वनिफीत तयार करा.

**दोन्ही स्पर्धांसाठी......**

- स्पर्धा पाचवी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी आहे.
- स्पर्धा सांघिक असून किमान ५ विद्यार्थी तरी प्रत्येक स्पर्धेमध्ये असायला हवेत.
- एका शाळेतील जास्तीत जास्त ३ गट प्रत्येक स्पर्धेत सहभागी होऊ शकतील.
- विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन एक गट तयार केला तर त्यांनाही या स्पर्धेमध्ये स्वतंत्रपणे सहभागी होता येईल.
- कोणत्याही विद्यार्थ्याला एकाच स्पर्धेमध्ये व एकाच गटामध्ये सहभागी होता येईल.
- स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी असल्याने मोठ्यांनी सहभाग घेऊ नये व विद्यार्थ्यांनीही मोठ्यांचे सहकार्य मागू नये.
- हस्तलिखित वा ध्वनिफितीतील कल्पना, लेखन, संगीत, सजावट व निर्मिती पूर्णतः विद्यार्थ्यांचीच असावी. विद्यार्थ्यांच्या प्रामाणिकपणावर आमचा विश्वास आहे.
- स्पर्धेसाठी प्रवेशशुल्क नाही. मात्र इच्छुकांनी ३१ डिसेंबर ९६ पर्यंत विशिष्ट नमुन्यात प्रवेश अर्ज भरून पाठवावा. प्रवेश अर्ज व स्पर्धेची तपशीलवार नियमावली स्थानिक व मुख्य कार्यालयात विनाशुल्क उपलब्ध आहे. (पोस्टाने मागविण्यासाठी स्वतःचा पत्ता लिहिलेले व एक रुपयाचे तिकिट लावलेले पाकीट पाठवावे.)

**हस्तलिखित वा ध्वनिफीत पाठविण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी ९७**

**स्पर्धेसाठी खास पारितोषिके**

प्रथम क्रमांक रु. ७५०/- द्वितीय क्रमांक रु. ५००/- तृतीय क्रमांक रु. २५०/-
उत्तेजनार्थ तीन पारितोषिके प्रत्येकी रु. १५०/-
तसेच किमान गुणवत्तेच्यावरील सर्व स्पर्धकांना पारितोषिक रुपये ५०/-

**आपल्या सुप्त गुणांना व्यक्त होण्याची संधी गमावू नका!**
**उत्स्फूर्तपणे स्पर्धेत सहभागी व्हा!**

टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन; PNCW/349, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

# हे ऋषिवर श्री अरविन्द

हे ऋषिवर अरविन्द, हे चिन्मय मधुरा-माते
युवाशक्ति हिन्दुराष्ट्राची, वन्दिते आज तुम्हाते ।।ध्रु.।।

वेड एक होते तुम्हा, मातृभूमिच्या मुक्तीचे
उग्र खड्ग तुम्ही, जागृत भारतशक्तीचे
'व्हा सिद्ध संगरा', वदला, 'सांडुनि भ्रान्ति-मोहाते' ।।१।।

द्रष्ट्या प्रतिभेने तुमच्या, स्वप्ने आम्हासी दिधली
'ही अखंड होइल भूमी, जरि खंडित आता दिसली,
संजीवन अध्यात्माचे, देईल तृषित विश्वाते' ।।२।।

'हा हिन्दुधर्म-हे राष्ट्र, अद्वैत असे उभयांचे
राष्ट्रार्थ तनुमने झटणे हे धर्माचरणचि साचे'
या धर्मसाधनेलागी, पथदर्शी तुमची चरिते।।३।।

तनुतीर्थे शुचितम तुमची, की मूर्त अभीप्सा झाली
अतिमानस उतरुन आले, त्या पुण्यबलाने खाली
जड हलले-हसले-धाले! लाहुनिया चैतन्याते।।४।।

जगदन्तरि आहा तुम्ही, चैतन्यस्वरूपी नटुनी
हृदयान्तरि यावे अमुच्या, प्रेरणामंत्र होवोनी
अम्हि पथिक देवसंघाचे, द्या आशीर्वच आम्हाते।।५।।

**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३० ☎ ४७७६९१
**कार्यालयाची वेळ** : स. १० ते संध्या. ७
**या अंकाची किंमत** : रु. ८/-
**वार्षिक वर्गणी** : रुपये १००/-
**प्रकाशन दिनांक** : राष्ट्रीय सौर १६ मार्गशीर्ष, शके १९१८
७ डिसेंबर, १९९६